Rotary 2020-2021

# southern star ...अवघे धरू सुपंथ

The official bulletin of Rotary Club of Pune South

Year : 51, Vol : 12, JUNE 2021

**IT ALWAYS SEEMS IMPOSSIBLE UNTIL IT'S DONE...**

**Nelson Mandela**

**President :** Rtn. Sudarshan Natu | **Secretary :** Rtn. Manisha Belgaonkar | **Editor :** Rtn. Yogesh Nandurkar

## Rotary Fellowships Month

Rotary Fellowships consist of members who share a common interest in recreational activities, sports, hobbies, or professions. These groups help expand skills, foster vocational development, and enhance the Rotary experience by exploring interests while developing connections around the world.

**OVERVIEW**

- Help participants make lasting friendships outside their own club, district, or country
- Advance Rotary's public image and identity
- Serve as an incentive for joining Rotary and for maintaining active membership

**ORGANIZATION**

- Function independently of Rotary International by establishing their own rules, dues requirements, and administrative structure.
- Are open to Rotarians, their family members, as well as participants and alumni of all Rotary and Foundation programs.

**STARTING A NEW FELLOWSHIP**

If your recreational or vocational interest isn't represented by Rotary's current Fellowships:

- Join a discussion group or start a new one on My Rotary. It's a great way to share your interest with other members.
- Use Rotary's presence on Facebook, Twitter, and LinkedIn to promote your idea.
- Attend the Rotary International Convention or other Rotary events to network and find others that share your interest.

**ADDITIONAL INFORMATION**

Visit **www.rotary.org/fellowships** for additional resources on Rotary Fellowships.

Source: www.rotary.org

- रोटरीनं प्रत्येक महिना विशिष्ट कामासाठी योजला आहे. त्याबद्दल महत्त्व आणि काय करायचं हे सांगणारं पान
- शिवाय रोटरी इंटरनॅशनलबद्दल काही विशेष

**रोटरी**

तुमचा लेख आवर्जून द्या..
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

## रश्मी उवाच

**रो. डीजी रश्मी कुलकर्णी**



**४ मे २०२१**

**ऐकण्यासाठी क्लीक करा...**


## *Kawach - A Youth Brigade*

Rotary District 3131 alongwith Rotex3131, Rotract District 3131 and RCP Parvati, RCP Camp, RCP Warje and RC Panvel conducted Kawach - A Rotary Youth Brigade online event on Sunday 30th May.

The event included information about Rotaract, interactive team building activities and guidance from eminent personalities for facing the pandemic period on 3 fronts, Physical, Mental and Financial. Our own Rtn. Dr. Avinash Bhondwe spoke about Physical Immunity in the pandemic, Rtn. Anand Kulkarni (AK) spoke about Mental Immunity. Financial Immunity guidance was by Rtn. Rakesh Jain.

This program had a huge participation of 360+ Rotarians, Rotaractors and students from as far as Kolkata and Indonesia.






- आपला क्लब रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ मध्ये येतो.
- डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रश्मी कुलकर्णी यांचा संवाद
- या डिस्ट्रिक्टमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम
- डिस्ट्रिक्टमधील क्लब्सचे महत्त्वाचे, दखलपात्र असे प्रोजेक्ट्स

## डिस्ट्रिक्ट कनेक्ट

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे

## 'बिगरी ते मॅट्रीक'


**सादरकर्ते – रो. राजेंद्र उत्तूरकर**

दिनांक – ३ मे २०२१




तीन मे ला झालेल्या साप्ताहिक सभेत प्रसिद्ध साहित्यिक श्री.पु.ल. देशपांडे लिखित 'बिगरी ते मॅट्रीक' या एकपात्री कथन–अभिवाचन प्रयोगाचा कार्यक्रम पार पडला. सादरकर्ते होते रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रोचे रो.राजेंद्र उत्तूरकर....

भारती विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू तंत्रनिकेतनमध्ये प्राचार्य असलेल्या रो.राजेंद्र उत्तूरकर यांना व्यावसायिक आणि प्रायोगिक रंगभूमीवर काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे. समन्वयक रो.अनिल गोगटे यांनी त्यांची ओळख करून देताना सांगितलं की, रो.राजेंद्र उत्तूरकर हे एक बहुरंगी आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे. ते उत्तम कथाकथनकार आहेत. टेलीफिल्म, ॲडफिल्म, सूत्रसंचालन अशा वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करण्याचा त्यांना अनुभव आहे. १९९८पासून ते भारती कला अकादमीच्या संचालकपदी काम करत आहेत. शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कामासाठी भारती विद्यापीठाचा 'सेवागौरव' पुरस्कार त्यांना मिळाला आहे. रो.राजेंद्र उत्तूरकर हे गिर्यारोहकही आहेत. आत्तापर्यंत शंभराहून जास्त गड–किल्ल्यांवर त्यांनी भ्रमंती केली आहे.



श्री.पु.ल. देशपांडेलिखित ‘बिगरी ते मॅट्रीक’ ही अतिशय प्रसिद्ध कथा रो.राजेंद्र उत्तूरकर यांनी सादर करून आजच्या नकारात्मक आणि तणावाच्या परिस्थितीतून थोड्यावेळासाठी तरी बाहेर पडायला मदत केली. त्यांच्या रंजक आणि नाट्यमय भाषाशैलीमुळे त्यांनी कथेतली वेगवेगळी पात्रं जिवंत करून रसिकांसमोर उभी केली. रंगभूमीवर काम करत असल्यामुळे कथेतल्या वेगवेगळ्या पात्रांचे संवाद, स्पष्ट आणि शुद्ध उच्चारांमुळे अतिशय उत्तम रितीनं सगळ्यांपर्यंत पोहोचत होते. साक्षात पुलंनी सादर केलेली ही कथा बहुतेक सगळ्यांनीच ऐकली आहे तरीही रो.राजेंद्र उत्तूरकर यांच्या कथाकथनाची शैली स्वतंत्र तरीही परिणामकारक आहे याची अनुभूती जसजसं कथाकथन पुढे सरकत होतं तसतशी येत होती.

रो.अतुल अत्रे यांनी रो.राजेंद्र उत्तूरकर यांच्या संवाद साधण्याच्या कलेचं, देहबोलीचं कौतुक केलं. सगळ्यांना मनभरून आणि मनमोकळं हसवल्याबद्दल रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथतर्फे त्यांचे आभार मानले आणि निखळ मनोरंजनाचा हा कार्यक्रम संपन्न झाला.

**व्हिडिओ इथे पाहा...**

## श्रद्धांजली विशेष सभा

दिनांक – १० मे २०२१




एप्रिल महिन्यात रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या पाच सदस्यांना देवाज्ञा झाली. दहा मे या दिवशी साप्ताहिक सभेत या पाच सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या सदस्यांनी विशेष शोकसभा आयोजित केली होती.

विश्वनाथ उर्फ विसुभाऊ गोडबोले नेहमी उत्स्फुर्तपणे क्लबच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेत असत. काश्मीर सद्भावना कॅम्पबद्दल त्यांना झालेला आनंद त्यांनी रो.प्रे.सुदर्शन नातू यांच्याकडे व्यक्त केला होता तसंच योग्य ती काळजी घेण्याबद्दलही सांगितलं होतं. सदैव हसतमुख, उत्साही, मदतीला तत्पर, दिलखुलास विनोदी स्वभाव, सामाजिक कार्यात पुढे असणारे, चिरतरुण, दागिन्यांच्या डिझाइन्सची उत्तम जाण असणारं असं हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व काळानं आपल्यापासून हिरावून नेलं अशा शब्दांत रो.प्रे.सुदर्शन नातू, रो.भाउसाहेब कुदळे, पी.पी.रो.दादासाहेब बेंद्रे, रो.अनिल लोखंडे, रो.गोविंदराव पटवर्धन, रो.सुभाष देशपांडे, रो.विरेन शहा, रो.शाम कुलकर्णी, रो.अनिल सुपनेकर यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या.

मेडिकल क्षेत्रातले डॉक्टर असल्यानं त्या आणि सगळ्यांच बाबतीतली मदत करायला सदैव तयार असे रो.नाना गोरे, त्यांच्या सेवाभावी वृत्तीसाठी कायम स्मरणात राहतील. आदिवासी भागात त्यांनी उल्लेखनीय कार्य केलं आहे. त्यांच्या सेवाधाम ट्रस्टमार्फत आदिवासी समाजाच्या छोट्याछोट्या अडचणी त्यांनी वेळोवेळी दूर करायचा प्रयत्न केला आहे. सर्वसमावेशक स्वभाव, उत्साही आणि सामाजिक भान असलेले कल्पक डॉक्टर रो.नाना गोरे यांची उणीव कायम जाणवत राहील अशा शब्दांत रो.प्रे.सुदर्शन नातू, पीपी.रो.दादासाहेब बेंद्रे, रो.भाउसाहेब कुदळे, रो.गोविंदराव पटवर्धन, रो.सुभाष देशपांडे, रो.विरेन शहा, रो.शाम कुलकर्णी, रो.अनिल लोखंडे, रो.अनिल सुपनेकर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

यशस्वी उद्योजक, स्पष्ट विचार आणि परखड मतं असणारे रो.श्रीकांत पोफळे यांच्या निधनाबद्दल सगळ्या सदस्यांनी दुःख व्यक्त केलं. क्लबच्या अनेक सदस्यांबरोबर त्यांचं मैत्रीचं, मार्गदर्शकाचं नातं होतं. यशस्वी व्यवसायिक असले तरी त्यांची आध्यात्मिक बैठक पक्की होती. नवीन उद्योजकांना मदत करायला ते कायम तयार असत या शब्दांत त्यांना रो.भाउसाहेब कुदळे, रो.गोविंदराव पटवर्धन, रो.विरेन शहा, रो.शाम कुलकर्णी, रो.अनिल सुपनेकर या सगळ्यांनी श्रद्धांजली वाहिली.

ॲन शैलजा महाजन आणि ॲन शैला ताम्हणकर या दोन ॲन्सना या विशेष शोकसभेत सगळ्या सदस्यांनी श्रद्धांजली वाहिली. या दोघीही रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या जुन्या आणि जाणत्या सदस्या होत्या. रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या ॲन्सचा भिशी कार्यक्रम असो किंवा क्लबचा एखादा सामाजिक उपक्रम असो रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या सर्व कार्यक्रमात त्यांचा उल्लेखनीय सहभाग असायचा. घर-संसार, सणवार, पै-पाहुणा, कुळाचार, व्रतवैकल्यं हे सगळं सांभाळून दोघीही सतत हसतमुख, प्रसन्न आणि उत्साही असायच्या. अशा ॲन्समुळेच क्लबमधला आनंद आणि उत्साह टिकून असतो अशा भावना रो.अनिल सुपनेकर, रो.सुभाष देशपांडे, रो.गोविंदराव पटवर्धन, रो.प्रे.सुदर्शन नातू, पी.पी.रो.दादासाहेब बेंद्रे, रो.भाउसाहेब कुदळे, रो.शाम कुलकर्णी, रो.विरेन शहा, रो.अनिल लोखंडे यांनी व्यक्त केल्या. सर्व मृतात्म्यांना श्रद्धांजली वाहून ही विशेष शोकसभा संपली.




व्हिडिओ इथे पाहा...

## ‘काश्मीरचे अंतरंग’


**रो. पीपी डॉ. सुधांशु गोरे**

दिनांक – १७ मे २०२१




सतरा मे या दिवशी झालेल्या साप्ताहिक सभेत ‘काश्मीरचे अंतरंग’ हा विशेष कार्यक्रम सादर झाला. रो.प्रे.सुदर्शन नातू यांनी उपस्थितांचं स्वागत केलं. बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन या संस्थेनं आर्मी गुडविल स्कूलमध्ये कोणत्या कोणत्या सुधारणा करता येतील याची पाहाणी करण्यासाठी रो.डॉ.सुधांशू गोरे यांना पाठवलं होतं. त्यानिमित्तानं गोरे सरांनी तिथल्या काही छोट्या–छोट्या खेड्यांना भेटी दिल्या. सद्भावना मेडीकल कॅम्पच्या आधी एक महिना गोरे सर काश्मीरला या स्पेशल मिशनवर पोहोचले होते असं कार्यक्रमाची सुरुवात करताना रो.प्रे.सुदर्शन नातू यांनी सांगितलं.

१९ मार्च २०२१ ते २ मे २०२१ या काळात रो.डॉ.सुधांशू गोरे काश्मीरमध्ये होते. गुरेज सेक्टरमधल्या दावर इथली तसंच मछल सेक्टरमधल्या राघवन पोस्ट इथली आर्मी गुडविल स्कूल आणि आजुबाजुच्या शक्य त्या सगळ्या आर्मी गुडविल स्कूल्स कशा चालतात याचा अभ्यास करणं, मशिकणं आणि शिकवणं’ या गोष्टी सहज सोप्या कशा होतील, त्यांत अधिक सुधारणा कशा होतील याचा अभ्यास करणं हे काम रो.डॉ.सुधांशू गोरे यांनी केलं. मार्चमधल्या कडाक्याच्या थंडीत आणि बर्फात गोरे सर गुरेजला पोहोचले. काश्मीरमध्ये मार्च ते ऑक्टोबर या काळात शाळा पूर्ण












क्षमतेने चालतात. विद्यार्थी पूर्ण संख्येनं उपस्थित असतात. याच काळात शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, पालक सभा यांचं आयोजन होतं. गुरेजमधल्या आर्मी गुडविल स्कूलच्या विद्यार्थ्यांशी आणि पालकांशी गोरे सरांनी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या तसंच पालकांच्या समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला. काश्मीरमधल्या मुलांना योग्य प्रशिक्षणाची खूप गरज असल्याचं गोरे सरांना प्रकर्षानं जाणवलं. स्थानिक महिला भिशीच्या निमित्तानं एकत्र येतात, एकमेकींबरोबर संवाद साधतात. काश्मिरी कशिदाकारी त्यांना चांगली अवगत असल्याचं लक्षात येताच गोरे सरांनी त्यांना अर्थार्जनाचा आणि गाव स्वयंपूर्ण करण्याचा हा एक चांगला मार्ग आहे असं तर सुचवलंच पण त्यासाठी रोटरी क्लब त्यांना नक्की मदत करेल असंही सांगितलं.

काश्मीरमधली भौगोलिक स्थिती ही भारताच्या बाकीच्या प्रदेशांपेक्षा खूप वेगळी आहे. बहुतांश दुर्गम असा हा भूभाग आहे. बहुदा याच कारणामुळे काश्मिरी जनतेला त्यांचे प्रश्न हे इतर भारतीयांच्या प्रश्नांपेक्षा जास्त गंभीर आणि जटील आहेत असं वाटत राहातं. आपल्याला हव्या तशा सुविधा आणि अधिकच्या सवलती मिळत नाहीत ही त्यांची खंत गोरे सरांच्या लक्षात आली. वेगवेगळी उदाहरणं देऊन हा गैरसमज दूर करण्याचा गोरे सरांनी वेळोवेळी प्रयत्न केला. काश्मीरमध्ये आर्मी जवानांचा एवढा त्रास नाही जेवढा स्थानिक पोलिसांचा आहे हे स्थानिक काश्मिरी लोकांशी



बोलताना समजलं. आर्मी आहे म्हणून शांतता आहे हे ऐकल्यावर गोरे सरांना इंडीअन आर्मीचा खूप अभिमान वाटला. काश्मिरी जनतेला सगळ्या गोष्टी वर्षांनुवर्षं आयत्या मिळाल्या आहेत त्यामुळे त्यांना श्रम करण्याची सवय नाही आणि त्यांची तशी तयारीही नाही. काश्मीरमध्ये अति मागासलेपणही नाही आणि अति पुढारलेपणही नाही... ही काही निरिक्षणं गोरे सरांनी नोंदवली. काश्मीरमधल्या वास्तव्यात भव्या चिक्कारा ही गोरे सरांबरोबर या उपक्रमात सहभागी झाली होती. तिचे वडील आर्मीत आहेत. वडील बरोबर नसताना पहिल्यांदाच एकट्यानी ती काश्मीरला गेली होती. या प्रवासात खूप गोष्टी शिकायला मिळाल्याचं तिनं सांगितलं. एक माणूस म्हणून प्रगल्भ करणारा असा हा अनुभव होता असं तिनं नमुद केलं.

वेळेच्या मर्यादेमुळे खूप काही ऐकायचं राहून गेलं आहे. हा कार्यक्रम अजून पूर्ण झाला आहे असं वाटत नाही तरी पुन्हा संधी मिळाल्यावर काश्मीरमध्ये शिक्षण क्षेत्रात आपण काय काम करू शकतो याबाबत आपण बोललं पाहिजे असं सांगून रो.मंदार पूर्णपात्रे यांनी रो.डॉ.सुधांशू गोरे यांचे आभार मानले आणि हा उद्बोधक कार्यक्रम संपन्न झाला.

**व्हिडिओ इथे पाहा...**


## एक्कावन्नावा वर्धापनदिन विशेष सभा

दिनांक – २५ मे २०२१

पंचवीस मे या दिवशी झालेल्या साप्ताहिक सभेत डॉ.विजया विपिन गुजराथी यांना रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथचं सदस्यत्व दिलं. रो.गोविंद पटवर्धन यांनी डॉ.विजया विपिन गुजराथी यांची औपचारिक ओळख करून दिली. डॉ.विजया विपिन गुजराथी आयुर्वेदिक वैद्य आहेत. त्या अनेक संस्थांमध्ये अधिकारी पदांवर कार्यरत आहेत. गेली अनेक वर्षं रोटरी क्लब बरोबर वेगवेगळ्या सामाजिक कार्यांत त्यांचा सक्रीय सहभाग आहे.

आधीपासून रोटरॅक्ट असलेल्या श्री.अधिक कदम यांच्या काश्मीरमध्ये सुरू असलेल्या उपक्रमांची, कार्याची सविस्तर ओळख रो.गोरे सरांनी करून दिली तसंच देश-विदेशातून त्यांना मिळालेल्या सन्मानांबद्दल, पुरस्कारांबद्दलही त्यांनी सांगितलं. या विशेष सभेत बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनच्या संस्थापक, अध्यक्ष श्री.अधिक कदम यांना रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथचं 'मानद सभासदत्व' देऊन गौरवण्यात आलं. रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ आणि यातले सगळे सदस्य मला माझ्या कुटुंबासारखेच आहेत तसंच रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथमधले सगळे ज्येष्ठ सदस्य मला माझ्या आई-वडिलांच्या ठिकाणी आहेत या शब्दांत अधिक कदम यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

आपल्या मनावर राज्य करणारी सदाबहार गाणी रो.हृषिकेश बडवे यांनी रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या एकावन्नाव्या वर्धापनदिनानिमित्त 'ओठांवरची गाणी' या कार्यक्रमातून सादर केली. एजी. रो. अभय जबडे यांनी



कार्यक्रमाचं खुमासदार सुत्रसंचालन केलं. 'तू सुखकर्ता तू दुःखहर्ता, तूच कर्ता आणि करविता' या गाण्यानी गणेशवंदन करून या कार्यक्रमाची सुरुवात झाली. मुंबईचा जावई या सिनेमातलं 'प्रथम तुज पाहता', अवघाची संसार या सिनेमातलं 'जे वेड मजला लागले' अशा एकामागोमाग एक सुरेल गाण्यांनी कार्यक्रम रंगत गेला. अभंगसदृश 'इंद्रायणी काठी' हे गाणं, मगुंतता हृदय हे', मरम्य ही स्वर्गाहुनी लंका' अशी शास्त्रीय संगीतावर आधारित गाणी रो. हृषिकेश बडवे यांनी खूप समरसून सादर केली. या कार्यक्रमाची संकल्पना रो.मंदार पूर्णपात्रे आणि रो.प्रे.सुदर्शन नातू यांची होती तर ध्वनी आणि तंत्र साहाय्य हेमंत उत्तेकर यांचं होतं. 'मास्टरपीस' हा स्वतंत्र संवादिनीवादनाचा कार्यक्रम करणाऱ्या आणि या विषयावर लेखन करणाऱ्या दिप्ती कुलकर्णी यांनी संवादिनी संगत केली तर संगीत अलंकार पदवीप्राप्त, आकाशवाणीचे मान्यवर तबलावादक अभिजित जायदे यांनी तबल्याची उत्तम साथ दिली. स्वतः रो.हृषिकेश बडवे हे चार्टड अकाउंटंट असून लहानपणापासून संगीत शिकत आहेत. अनेक संगीत नाटकांत त्यांनी काम केलं आहे. शास्त्रीय संगीताचा मानबिंदू असलेल्या 'सवाई गंधर्व महोत्सवा'त आपली कला सादर करण्याची संधी त्यांना मिळाली आहे. 'सुरत पिया की न छिन बिसरायी' या अनेक रागांत आणि अनेक तालांत बांधलेल्या गाण्यानी या अभिरुचीपूर्ण मैफिलीची सांगता झाली.

श्री. अधिक कदम आणि डॉ.विजया गुजराथी या दोन सदस्यांचं रो.रवींद्र प्रभुणे यांनी रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथमध्ये स्वागत केलं. अप्रतिम निवेदन, सुश्राव्य गायन आणि सुरेल साथसंगत लाभलेल्या या सांगितिक मेजवानीला 'वाह!' या एका शब्दातच खरी दाद द्यायला हवी असं सांगून रो.रवींद्र प्रभुणे यांनी सगळ्या कलाकारांचे आभार मानले आणि ही साप्ताहिक सभा संपन्न झाली.

**व्हिडिओ इथे पाहा...**

## ‘अष्टपैलू लेखिका – सौ.शकुंतला फडणीस’

**सादरकर्त्या– रो. लीना अनिल गोगटे**

दिनांक – ३१ मे २०२१



३१ मे या दिवशी झालेल्या साप्ताहिक सभेत ‘अष्टपैलू लेखिका – सौ.शकुंतला फडणीस’ हा कार्यक्रम सादर झाला. सौ.शकुंतला फडणीस यांची कन्या, रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या ॲन आणि रोटरी क्लब ऑफ हेरिटेजच्या रो. लीना गोगटे यांनी कार्यक्रमाचं संयोजन केलं. सौ.शकुंतला फडणीस विनोदी लेखिका होत्या. विनोदी कथा, विविध लेख, बालकविता आणि बालनाट्य या क्षेत्रांत त्यांचं भरीव योगदान आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष आचार्य अत्रे पुरस्कारप्राप्त प्रा.मिलिंद जोशी तसंच प्रसिद्ध साहित्यिक आणि समीक्षक डॉ.निलिमा गुंडी यांचा विशेष सहभाग होता.

रो.मंदार पूर्णपात्रे यांनी दोन्ही मान्यवरांचं आणि रो. लीना गोगटे यांचं स्वागत केलं. सौ.शकुंतला फडणीस यांची ओळख करून देताना रो.मंदार पूर्णपात्रे यांनी सांगितलं की, सौ.शकुंतला फडणीस एक उत्तम विनोदी कथालेखिका होत्या. बालसाहित्य लेखन, व्यंगचित्रांवर आस्वादक लेखन, कथाकथन, भाषणलेखन या क्षेत्रांतही त्यांनी खूप काम केलं आहे. त्यांना उत्कृष्ट बालसाहित्यासाठी राज्य शासनाचे तीन पुरस्कार तसंच अनेक खासगी पुरस्कार मिळाले आहेत.

अनेक वर्षांपासूनच्या सौ.शकुंतला फडणीस यांच्या स्नेही प्रसिद्ध साहित्यिक आणि समीक्षक डॉ.निलिमा गुंडी यांनी सौ.शकुंतला फडणीस यांच्या आठवणी सांगितल्या. साहसकथा, बालनाट्यलेखन, बालकविता यांबरोबरच विविध भाषा व्यवहारांवरचं विनोदी लेखन, त्यासाठी भाषेवर असलेली पकड, अचुक निरिक्षण हे सौ.शकुंतला फडणीस यांचे गुणविशेष त्यांनी नमुद केले. सौ.शकुंतला फडणीस यांच्या वेगवेगळ्या पुस्तकांचा उल्लेख करून त्यांतलं कायकाय भावलं, आवडलं ते डॉ.निलिमा गुंडी यांनी सांगितलं. असं आनंदी, उत्साही, खेळकर आणि हसरं व्यक्तिमत्त्व

आपल्यात नाही याबद्दल डॉ.निलिमा गुंडी यांनी हळहळ व्यक्त केली.

सौ.शकुंतला फडणीस यांच्याकडे चौकटीबाहेरचं, परिघाबाहेरचं जग दाखवण्याचं कसब होतं. त्यांनी वर्मावर बोट ठेवणारी पण तरीसुद्धा हास्य निर्माण करणारी विनोदनिर्मिती केली असं प्रा.मिलिंद जोशी यांनी सांगितलं. त्यांनी निरपेक्ष भावनेनं साहित्यनिर्मिती केली म्हणूनच त्या समाधानी होत्या आणि या समाधानामुळेच त्या कायम प्रसन्न असायच्या. कुशल गृहिणी असूनही जगात काय चाललं आहे याचा त्या कायम कानोसा घ्यायच्या. त्यांच्या या गुणाचा बालसाहित्य क्षेत्रात काम करताना त्यांना खूप उपयोग झाला. चांगल्या कामासाठी पाठीवर कौतुकाची





थाप देणाऱ्या, निखळ स्नेह असणाऱ्या वडीलधाऱ्या व्यक्तीची उणीव कायम जाणवेल अशा भावना प्रा.मिलिंद जोशी यांनी व्यक्त केल्या.

आपल्या आईकडून कथाकथनाचा वारसा घेतलेल्या रो. लीना गोगटे यांनी वाघ-वाघीण आणि दोन बालमित्र या सौ.शकुंतला फडणीस यांच्या दोन कथा वाचिक अभिनयातून सादर केल्या. सौ.शकुंतला फडणीस या उत्तम संयोजक, सहचर, सचिव होत्याच पण या भूमिका पार पाडतानाच एक वक्तशीर, कडक शिस्तीची आईही होत्या. शुद्धलेखनातला अचुकपणा, एकूणच लेखनातला टापटीपपणा, नीटनेटकेपणा हे त्यांचे गुण वाखाणण्यासारखे होते. पुण्यासारख्या मध्यवर्ती शहरात राहत असल्यामुळे घरात सतत पाहुण्यांचा, नातेवाइकांचा राबता असला तरी घरातल्यांची योग्य ती काळजी घेण्याचं कसब त्यांना अवगत होतं असं रो.लीना गोगटे यांनी सगळ्यांना सांगितलं. क्षौर्य देसाई, अवंती आणि मीरा प्रभुमिराशी, प्रिशा पटवर्धन, अस्मी प्रभुणे आणि मुक्ता देशपांडे या

ॲनेट्सनी कार्यक्रमात सौ.शकुंतला फडणीस यांच्या काही बालकविता सादर केल्या.

मराठी साहित्य विश्वात सर्जनशील पतीपत्नींच्या जोड्या बघायला मिळतात. श्री.शि.द.फडणीस आणि सौ.शकुंतला फडणीस हे असंच एकमेकांना पुरक जोडपं... आज सौ.शकुंतला फडणीस यांच्या कर्तृत्वाच्या वेगळ्या पैलूंची ओळख सगळ्यांना झाली. रो.लीना गोगटे यांच्याबरोबरच प्रा.मिलिंद जोशी आणि डॉ.निलिमा गुंडी यांनीही सौ.शकुंतला फडणीस यांची स्वभाववैशिष्ट्यं आपल्यासमोर ठेवली असं सांगून आयपीपी अभिजित जोग यांनी प्रा.मिलिंद जोशी, डॉ.निलिमा गुंडी आणि रो.लीना गोगटे यांचे रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या वतीनं आभार मानले. सौ.शकुंतला फडणीस यांच्या बालकविता सादर केलेल्या सगळ्या ॲनेट्सचेही त्यांनी मनापासून कौतुक केलं आणि हा कार्यक्रम संपन्न झाला.




व्हिडिओ इथे पाहा...

➢ क्लबच्या साप्ताहिक सभांचा सभेनुसार गोषवारा

## साप्ताहिक सभा

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
एके / यामिनी पोंक्षे

# कल, आज और कल

**रो. प्रे. सुदर्शन नातू**

**ऐकण्यासाठी क्लीक करा...**

रोटरीच्या मित्रमैत्रिणींनोऽ बघता-बघता हे वर्ष संपत आलं. हा आपल्या बुलेटीनचा या वर्षातला शेवटचा अंक. या अंकामध्ये प्रेसिडेंटनं काहीतरी लिहावं असं बुलेटीन कमिटीचे चेअरमन रोटेरिअन योगेश नांदुरकर यांनी सुचवल्यावर विचार केल्यानंतर असं लक्षात आलं की वर्षभर घडलेल्या वेगवेगळ्या कार्यक्रमांचा वृत्तान्त आपण सर्वांना देत आलो पण हे सर्व किंवा काही विशिष्ट कार्यक्रम ठरवताना त्यामागं बऱ्याच घटना आणि काही गमतीजमती घडतात. त्या आपल्यापुढं येतातच असं नाही त्यामुळं या रोटरी वर्षातल्या काही ठळक उपक्रमांचं वेगळेपण मी थोडक्यात विशद करणार आहे.

कोविड-१९मुळं या वर्षीचे कार्यक्रम ठरवताना नेहमीप्रमाणं आपण टीम एकत्र करून त्यावर विस्तारानं चर्चा करून मग कार्यक्रमाची रूपरेषा आखणी करू शकलो नाही त्यामुळं कार्यक्रम ठरवताना या वेळी वेगळ्याप्रकारे गृपबरोबर चर्चा करावी लागली. फोनद्वारे किंवा झूमद्वारे मिटिंग्ज घ्याव्या लागल्या आणि ते वाटलं तेवढं सोपं नव्हतं. आपण एकदा भेटून ठरवू आणि पुढं जाऊ असं नुसतं म्हणायला लागायचं. मला आठवतंय नेहमी आपला पहिलाच कार्यक्रम हा वृक्षारोपणाचा असतो पण त्या वेळी करोनामुळं प्रत्यक्ष भेटणं अवघड होतं...! सर्वत्र संचारबंदी, भयभीत वातावरण यांमुळं त्या कार्यक्रमाचं नियोजन कसं करावं हेच आम्हाला सुचत नव्हतं. वृक्षारोपण म्हटलं की त्या जागेची पाहणी, तिथं असणाऱ्या सोयी, झाडं कुठून मिळणार, ती कशी न्यायची, अशी फार तयारी लागते पण आपल्या क्लबमध्ये वर्षानुवर्षं ही धुरा सांभाळणारे रो.नितीन, उत्साही आणि उत्तम साथ देणारे रो.रवींद्र प्रभुणे आणि पीपी रो.डॉ.सुधांशु गोरे कामाला लागले होते. आम्ही भेटून किंवा फोनवर बोलून रूपरेषा ठरवत होतो. डॉ.गोरे सरांच्या अथश्रीमध्ये राहणाऱ्या त्यांच्या मित्रांनी बीजरोपणाची कल्पना दिली आणि मला ती अतिशय आवडली. आपण दरवेळी वाढलेली झाडं आणून लावतो पण त्यापेक्षा रोपं तयार केली तर पुढील अनेक वर्षांचा प्रश्न सुटू शकतो असं वाटलं आणि तो पहिला कार्यक्रम झाला.'आम के आम और गुठलियों के दाम।' वृक्षरोपणाचे कार्यक्रम दोन जागी करायचे असं ठरवलं... एक कर्नलवाडीला आणि दुसरा चांबळीला. ग्रामगौरवच्या डॉ.सोनाली शिंदे यांनी आपण मिळून कार्यक्रम करू या असं आनंदानं सांगितलं. झाडं जगवणं हा महत्त्वाचा उद्देश असल्यानं ती जागा निश्चित केली. त्यांचं फार मोठं काम त्या ठिकाणी चालू आहे आणि आपल्या क्लबनंपण गोरे सरांच्या अध्यक्षीय काळात जवळजवळ साडेतीन हजार झाडं लावली होती. श्री.रघुनाथ ढोलेंबरोबर बोलून झाडांची सोयसुद्धा केली पण तिकडं जाणार कसं? करोनाच्या भीतीमुळं आणि संचारबंदीमुळं जायचं म्हणजे आम्हाला नितीनची गाडी! पोलीस पास असल्यानं आम्ही थोडेफार का होईना निर्धास्तपणे जाऊ शकत होतो पण रस्त्यावर लोकांची वानवा... त्यामुळं टेम्पो, मजूर मिळवायचे कुठून? आम्ही एक टेम्पोवाला ठरवला तर पठ्ठा दर दहा मिनटांनी दर वाढवत होता आणि शेवटी पळून गेला. मग परत दुसऱ्या दिवशी वरात जेजुरीकडं! या तिघांनीही जेजुरीला जाऊन श्री.रघुनाथ ढोले यांच्याकडून थोडीथोडकी नाहीत तर तब्बल दोनशेहून अधिक झाडं स्वतः उचलून गाडीत टाकली आणि चांबळीला पाठवली. त्या ठिकाणी खड्डे करण्याचं काम ग्रामगौरवनं पूर्ण केलं. ही तयारी झाल्यावर क्लबमध्ये आपण सांगितलं आणि हो-नाही करत-करत काही मंडळी तयार झाली! आपण जेव्हा वृक्षारोपणासाठी तिथं गेलो त्या वेळी ही जय्यत तयारी केली होती ना... त्यामुळंच आनंद घेऊ शकलो. त्या वेळचे फोटो बघितल्यानं पुढच्या वेळी अधिक मंडळी आली हे आपल्याला माहीत आहेच. मोकळ्या हवेमध्ये थोडा वेळ का होईना करोनाच्या भीतीपासून मुक्त होऊन एक दिवस आनंदात घालवू शकलो...! पुढचा कार्यक्रम तर

अजून छान झाला पण त्याआधी आम्ही जेजुरीला जाऊन चारशे झाडं आणून ठेवली होती!

दरवर्षी आपण दिवाळीला वेल्ह्यात पासलीतल्या आणि इतर गावांमधल्या गोरगरीब मित्रमंडळींना धान्याचं आणि दिवाळी फराळाचं वाटप करत असतो. या वर्षी तो कार्यक्रम होणार की नाही अशी शंका होती. या वर्षी हा कार्यक्रम बहुधा रद्द करावा लागेल असंच वाटत होतं. रो.नितीन आणि श्री.आशिष क्षीरसागर यांच्याबरोबर बोलणं झालं होतं... पण आपले मेंबर्स येतील का याची खात्री नव्हती. त्याच सुमारास मी बोर्ड मिटिंगनिमित्त एक डिनर मिटिंग आयोजित केली होती आणि सुदैवानं हॉटेलपण मिळालं. त्या मिटिंगला आपल्या क्लबचे खूप जण सहभागी झाले होते. मी हा विषय विपीनभाई यांच्याकडे काढला त्या वेळेस त्यांनी आणि विनोदभाईंनी मिटिंगमध्ये आवाहन करू आणि मग ठरवू असं सुचवलं आणि गंमत म्हणजे मिटिंगमध्ये आपण या वर्षीही हा कार्यक्रम करावा आणि त्यासाठी लोकांनी मदत करावी असं आवाहन त्या दिवशी केलं आणि नेहमीप्रमाणे विपीनभाईंनी सुरुवात केली आणि बघता-बघता आपण तब्बल एक लाख रुपये जमा केले. रो.विनोदनं स्वस्त दरात उत्तम धान्य मिळवून दिलं त्यामुळं आपण जास्त लोकांना धान्य आणि फराळ यांचं वाटप करू शकलो. या वेळी फराळ नको, धान्यच देऊ असं ठरलं पण गाड्या माझ्या घराकडून घ्या असं रो. विपीननं रात्री ऐन वेळी सांगितलं. मी शंभर बॉक्सेस लाडू ऑर्डर केले आहेत असंही सांगितलं. अचानक ठरल्यामुळं सगळ्यांचीच धांदल उडाली. मग सगळी वरात त्यांच्या घराकडं! गाड्यांमध्ये बॉक्सेस भरून मग पुढं वेल्ह्याकडं निघालो आणि नेहमीप्रमाणे वेल्ह्यात वडापाव खाऊन पुढं. त्या वेळी आपण पुण्याहून टोमॅटो, काकडी, गाजर, कांदे हे सलाड करायला नेलं होतं याचीपण आठवण झाली. त्या कार्यक्रमाच्या वेळी आणि दुपारी जेवणाच्या वेळी रो.विपीननं सर्वांना आग्रहानं लाडू खाऊ घातले. अतिशय आनंदात होता तो त्या दिवशी. सर्वांसोबत आनंदाचे क्षण घालवून आणि वाटून गेला असं मला वाटतं.

एके दिवशी आपले पीडीजी भाऊसाहेब यांचा फोन आला 'आमच्या सोसायटीत श्री.रणजित पाल राहतात आणि ते रिटायर्ड आयएएस ऑफिसर आहेत आणि सोयाबीनपासून दूध आणि दुधाचे पदार्थ कसे तयार करायचे हे शिकवण्याची रणजित पाल यांची इच्छा आहे आणि रोटरी हे काम पुढे करू शकते असं त्यांना वाटतं त्यामुळे तुम्ही त्यांना भेटण्यासाठी माझ्या ऑफिसमध्ये नक्की या. दत्ताजी देवधर, सुधांशु गोरे सर, तुम्ही, नितीन पाठक आणि मी- असे आपण त्यांच्याबरोबर चर्चा करून पुढे काय करता येईल याचा विचार करू.' असं भाऊसाहेबांनी फोनवरून सुचवलं. त्याप्रमाणे आम्ही त्यांच्याबरोबर अपॉइंटमेंट ठरवून भाऊसाहेबांच्या ऑफिसमध्ये वाट पाहत बसलो होतो. थोड्या वेळानं एक सद्गृहस्थ आत आले आणि 'मी रणजित पाल' अशी त्यांची ओळख त्यांनी करून दिली. त्यांना बघून आम्ही आश्चर्यचकित झालो कारण ते फारच तरुण म्हणजे जवळपास ऐंशी वर्षांचे होते! पण त्यांचा उत्साह तरुणांना लाजवेल असा होता. त्यांनी आम्हाला सोयाबीनची आणि त्यापासून होणाऱ्या पदार्थांची भरपूर उपयुक्त माहिती दिली आणि गंमत म्हणजे 'तुम्ही सोया टोफू (पनीर), सोया ताक/लस्सी आणि सोयाखंड हे पदार्थ खाल्ले आहेत का?' असं त्यांनी विचारलं. आम्ही नाही म्हटल्यावर त्यांनी आग्रह केला की तुम्ही माझ्या घरी ते पदार्थ खायला आलंच पाहिजे. तुम्ही ते खाल्ले की मी काय म्हणतो आहे ते तुम्हाला पटेल! पुण्याच्या लोकांना चितळे श्रीखंड माहीत आहे म्हणून एक वेळ सोयाखंड माहीत नसणार असंही सांगितलं! हा उपक्रम मला गोरगरीब बायकांपर्यंत नेऊन पोहोचवायचा आहे... जेणेकरून त्यांना उत्पन्नाचं साधन होईलच शिवाय खेड्यातल्या कुपोषित मुलांना दूधपण मिळेल असं कळकळीनं सांगितलं. लवकरच कळवतो असं उत्तर त्यांना देऊन आम्ही परतलो आणि हा कार्यक्रम करता येईल का, कुठे करता येईल याची चाचपणी सुरू केली... पण दोनच दिवसांत भाऊसाहेबांचा फोन की 'अहोऽ ते विचारत आहेत की तुम्ही लोक माझ्याकडे सोया जेवण करायला केव्हा येणार? प्रशिक्षणाचा कार्यक्रम लवकर करा. मी त्यासाठी मिक्सरपण आणून ठेवला आहे.' आम्ही त्यांना कळवलं की 'तुमच्या घरी आम्ही जेवायला नंतर येऊ पण हा कार्यक्रम नक्की करू.' मंडळी, तुम्हाला कल्पना आहेच... १८ जानेवारीचा हा कार्यक्रम अतिशय उत्तम झाला आणि

त्या कार्यक्रमाचं फळ म्हणजे आज आंबवणे, करंजवणे, आस्कवाडी, सांगवी या आजूबाजूच्या खेड्यांतील जवळपास शंभर मुलांना सोयाबीनपासून तयार केलेलं दूध आणि लस्सी त्यांच्या आहारात रोज मिळतं. रोटरीच्या कामांमध्ये बाहेरच्या लोकांचा कसा सहभाग असतो याचं हे उत्तम उदाहरण. रो.दत्ताजींच्या फार्महाऊसवर हा कार्यक्रम झाला आणि रणजित पाल यांनी तो खूप एन्जॉय केला. फार्महाऊस आणि दत्ताजींचं अगत्य यांनी तर ते खूश झाले. आम्ही चौघं त्यांच्याकडे चार मार्चला संध्याकाळी जेवायला गेलो. पोळ्या, भात आणि डाळ सोडून सर्व पदार्थ सोयापासून तयार केले होते. सोया पनीर, सोया टिक्की, मसाला ताक आणि योगर्ट अतिशय उत्तम. त्यांची चेतरन नावाची सोया प्रॉडक्टची फॅक्टरी आहे पण तरीसुद्धा हे पदार्थ तयार करायला शिकवून खेड्यातल्या बायकांना स्वावलंबी करण्याची त्यांची प्रबळ इच्छा आहे! सोयाखंड आणि आम्रखंड दोन्ही खा बरं!

गेल्या वर्षी रोटरीला भारतामध्ये येऊन शंभर वर्षं झाली. त्यानिमित्तानं कलकत्त्यामध्ये एक मोठी कॉन्फरन्स आयोजित केली होती. तिच्यात भारतातील अनेक नामवंत लोकांना गौरवण्यात आलं... ज्या लोकांनी रोटरीबाहेर असूनही सामाजिक सेवेमध्ये मोठी कामगिरी बजावली आहे. अशा लोकांचे रोटरी इंटरनॅशनल प्रेसिडेंटच्या हस्ते सत्कार करण्यात आले. त्यामध्ये श्री.अधिक कदम (आपल्या रोटरॅक्ट क्लबचे पूर्वसदस्य) यांना ‘रोटरी हिरो ऑफ द ह्युमॅनिटी’ असा सन्मान देऊन गौरवण्यात आलं. तो दिवस होता १० फेब्रुवारी २०२०. आपले पीपी रो.वीरेनभाई त्या ठिकाणी जातीनं हजर होते आणि मी तो कार्यक्रम यूट्युबवर पाहत होतो. त्यांचं आणि माझं फोनवर बोलणं झालं आणि त्याच वेळी त्यांनी ‘आपण बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनबरोबर पुढच्या वर्षी काश्मीरमध्ये एखादा कॅम्प करायचा का?’ असे सुचवलं. मी फोनवरच त्यांना तत्काळ होकार देऊन टाकला. श्री.अधिक कदम रोट्रॅक्टर असताना आमच्या घरी यायचे आणि नंतर ते करत असलेल्या कामाची माहिती असल्यामुळे मी लगेचच हो म्हणालो. सद्भावना मेडिकल कॅम्प करायचा असं ठरलं त्या वेळी... मात्र येणाऱ्या अडचणी खूपच आहेत हे जाणवलं आणि करोनामुळं तर हे आव्हानच होतं. डॉ.गोसावी यांनी भरपूर कॅम्प घेतले आहेत आणि अटेंडपण केले आहेत... त्यामुळं कॅम्पची धुरा त्यांच्या खांद्यांवर होती. मुळात हा कार्यक्रम केव्हा घ्यायचा, त्याला कुठल्या तारखा सोयीच्या होतील, लसीकरण झालेलं असेल का... काश्मीरमधली परिस्थिती आणि महाराष्ट्राची सद्यःस्थिती यांमुळं अनेक प्रश्नचिन्हं होती. इंडिअन आर्मीनं जरी निमंत्रण दिलं होतं तरीसुद्धा सर्व तयारी करणं म्हणजे एक मोठं आव्हान... पण बघता-बघता तेही शक्य झालं आणि आपल्या क्लबनं आणि डिस्ट्रिक्टनं एक उत्तम प्रोजेक्ट केला. अर्थातच याचं श्रेय श्री.अधिक कदम, वीरेंद्र शहा आणि रो.डॉक्टर गोसावी यांना आहे. कॅम्प झाला, आम्ही सर्व जण सुखरूप परत आलो आणि आता काश्मीरमध्ये लॉकडाऊन आहे. ‘ईश्वरेच्छा बलियसी’ असं म्हणतात ते खोटं नाही बरं का. माझ्या अध्यक्षीय कारकिर्दीत हा प्रोजेक्ट झाला याचा आनंद वेगळाच.

आमच्यासाठी काहीतरी करा म्हणजे आम्हाला शेतीबरोबर जोडउत्पन्नाचं साधन मिळेल आणि परिस्थिती सुधारेल अशी विनंती शेनवड गावातले लोक आपले रो.नितीन पाठक यांना गेल्या काही वर्षांपासून करत होते. त्याकरता गोदानचा प्रोजेक्ट करावा असं त्याला वाटत होतं. अर्थात याआधी त्याची वेळ आली नसल्यानं तो प्रोजेक्ट या वर्षी सुरू केला. काऊ डोनेशनचा प्रोजेक्ट ग्लोबल ग्रॅन्ट प्रोजेक्ट म्हणून रोटरी क्लब ऑफ नॉर्थ अनेक वर्षं राबवत आहे... पण आपण ते करू शकणार नसल्यानं आपल्याच अर्थसाहाय्यातून गोदान करता येईल का असा विचार सुरू झाला.त्या दृष्टीनं तयारी करावी असं नितीन, गोरे सर आणि मी, आम्ही तिघांनी ठरवलं. कुठल्या गायी विकत घ्यायच्या, त्या वेल्हे भागात टिकतील का, कुठून मिळतील इत्यादी अनेक प्रश्न निर्माण झाले. वेगवेगळ्या लोकांशी चर्चा करून त्याबद्दल बरीच माहिती करून घेतली. नितीन तर स्वतः वझे गुरुजींच्या गोशाळेत जाऊन रोज दोन तास तिथं घालवायचा आणि माहिती गोळा करायचा. गोरे सरांनीपण त्यांच्या ओळखीचे श्री.देवल यांच्याबरोबर चर्चा केली. बऱ्याच दिवसांनंतर एकमत झालं आणि मसुदा ठरला आणि मग प्रोजेक्ट आकार घेऊ लागला. क्लबमध्ये

आव्हान केल्यानंतर फर्स्टलेडी सुगंधा, रो.माधुरी किरपेकर आणि त्यांचे मित्र श्री.दड्डीकर यांनी पैसे दिले आणि प्रोजेक्टला सुरुवात झाली आणि बघता–बघता आपण तीसपेक्षा अधिक गोदान सत्पात्री करू शकलो. गायी मिळवणं हे अत्यंत कठीण काम नितीन आणि त्या गावचे पोलीसपाटील यांनी सांभाळलं. एकदा पाच गायी आणायला ही मंडळी खाली कोकणात महाडला गेली आणि गायींना डोंगर चढून पायी आणताना एक गाय पळाली की! रात्रभर शोधत होते. शेवटी मिळाली पण मग मात्र टेम्पो करून आणल्या आणि येताना कुणी पकडलं तर (कसाईखान्यात नेत नाही ना?) म्हणून आपलं पत्र दिलं आणि ते ऐन वेळी द्यायला लागल्यानं एकच धावपळ झाली. रो.जितेंद्रनं रात्री दहा वाजता ते पत्र दिलं. प्रत्येक गाय विकत घेताना आणि आणताना काहीतरी नवीन समस्या येतात पण गोमाता कृपेनं त्या सुटतातही!

आपला क्लब गेली कित्येक वर्षं नाट्यस्पर्धेत भाग घेत आहे आणि या रोटरी वर्षात आपण स्पर्धेत नक्की भाग घेणार असं ठरवलं होतं आणि त्यासाठी आपल्या परदेश सहलीची तारखासुद्धा ॲडजस्ट करायच्या असं मी ठरवलं होतं पण विधिलिखित वेगळंच होतं. ट्रिपपण नाही आणि नाट्यस्पर्धापण नाही त्यामुळं मंडळी जरा खट्टूच झाली होती पण डिसेंबर महिन्यात वातावरण पूर्ववत होऊ लागलं तसं ही स्पर्धा घ्यायची असं शिवाजीनगर क्लबनं ठरवलं. आपल्या टीमला विचारलं... करू या पण शक्य आहे का, होणार का, कुणी प्रॅक्टिसला येईल का याची चौकशी सुरू केली. नाटकाच्या प्रॅक्टीससाठी एकत्र येणं अत्यंत जरुरीचं असतं आणि करोनामुळं ते कठीण होतं. जागेचा प्रॉब्लेम आला पण आपले स्नेहा आणि संजीव पुढं आले आणि नाटकाची प्रॅक्टीस कुठं घ्यायची हा प्रश्न सुटला! एका वेळी दोन ते चार लोकांनी प्रॅक्टीस सुरू केली आणि नाटक थोडा थोडा आकार घेऊ लागलं. आता सर्वांनी एकत्र येऊन प्रॅक्टीस करायला लागणार म्हणेपर्यंत किरण आणि स्वाती वेलणकर, दोघंही करोनाग्रस्त झाले त्यामुळं वातावरण टेन्स झालं. त्यांच्याबरोबर कोण होतं वगैरे प्रश्न सुरू झाले. तेवढ्यात रो.अनिल गोगटे आजारी पडले आणि मग नाटकाच्या संहितेत बदल झाला आणि काही पात्रं गळली. धमाल चालू होती. रोज नवीन डायलॉग पाठ करायला लागायचे. रो.श्वेता तर अक्षरशः रडकुंडीला यायची कारण ती प्रमुख भूमिकेत! एका भागात कॅंटीनचा सीन... त्यामुळं प्रत्येक प्रॅक्टीसला ‘जे’ ग्रीन बेकरीचे सामोसे आणायचा. बाकीचे खूश. ज्या दिवशी सर्वांची एकत्र रंगीत तालीम झाली नाऽ तेव्हाची धमाल बघण्याची मजा काही औरच होती. थोड्या वेळ का होईना पण सगळे वेगळ्या विश्वात रमायचे! स्टेजवर आपलं नाटक अतिशय उत्तम झालं. आपल्याला जरी पारितोषक मिळालं नाही तरीसुद्धा नाटकात काम करण्याची गंमत मात्र अफाट होती. सर्वांनी आनंद लुटला. मला मात्र या वर्षी नाटकात काम करायला मिळालं नाही याची खंत वाटली म्हणजे डायरेक्टरला मी नकोच होतो. ‘...पण तुम्ही या वर्षी प्रेसिडेंट म्हणजे भरपूर काम आणि प्रॅक्टीसला दांडी...’ या त्यांनीच दिलेल्या सबबीमुळं आम्ही कट! पण ही कसर या वर्षी फर्स्ट लेडी सुगंधा हिनं भरून काढली. आता पुढल्या वर्षी मी नक्की काम करणार बरं का!

तसं म्हटलं तर या वर्षी बऱ्याच किंवा प्रत्येक कार्यक्रमामध्ये, प्रोजेक्टमध्ये, मिटिंगमध्ये काहीतरी वेगळेपण होतं. पडद्यमागे बरेच कलाकार खूप कष्ट घेत होते आणि आपण ते प्रोजेक्ट रिपोर्टमध्ये लिहितोच असं नाही त्यामुळं काही प्रोजेक्ट करत असताना काय काय झालं आणि कुणी काय केलं असं सांगावंसं वाटलं म्हणून हा खटाटोप. या सर्व गोष्टी करत असताना एक नक्की जाणवलं की आपल्या क्लबचे सदस्य मनापासून प्रत्येक प्रोजेक्टसाठी जमेल तसं सहकार्य करत आहेत. प्रत्येकाला कितीतरी अडचणी होत्या. स्वतःची, घरच्यांची आणि इतरांची काळजी घेऊन, सर्व सांभाळून हे काम करणं सोपं नाही त्यामुळं सर्वांचं खूप खूप कौतुक आणि आभार.

बाकीच्या प्रोजेक्टच्या गमतीजमती पुढं केव्हातरी फेलोशीप घेताना बोलण्यासाठी ठेवतो.

हे करोनाचं संकट लवकरच संपेल अशी अपेक्षा करू या... नेहमीच्या रोटरीच्या वातावरणात आपण पुन्हा लवकरच परतू असं मला वाटतं.

## *Dream Team*

***Rtn. PN Sanjeev Ogale***

**Year of the Dream Team**

**Rotary Club of Pune South Year 2020-21**

On being nominated as PN and Director of Club Administration Committee during this Rotary Year 2020-21 it was a task not planned for a pandemic, hence assembling a team and living through this year in literally isolation was the most difficult task faced by all of us.

Beginning of March 2020 we all have been forced to stay in a lockdown and it is still going on. There was a little relief in between where we could meet and look forward to seeing each other every week. Praying that these bad days of pandemic hopefully will get over very soon.

Every dark cloud has a silver lining and this silver lining was the Dream Team of Rotary Club of Pune South.

This Dream Team that has been ambitious and been in a driver's seat all throughout the year irrespective of the situation. It has been strong enough to fathom anything possible. It has been a Dream Team which has solved the most complex problems with the best solutions. With all volunteering to be a part of the team was most heartwarming with each member of the team giving his best skills and delivering without batting an eyelid.

Before I thank this Dream Team which has proved to be the most dominant team that worked tirelessly and assembled to work in the Year 2020-21 I would say they have set a new bench mark to follow in such difficult times. Having changed the game from regular meetings to zoom meetings with such ease and helping everyone to follow suit have shown us how to play the game in difficult times.

Yes, I am referring to Bulletin Committee, Attendance Committee, and the Programme Committee.

Let me first thank the Chairman and their teams

| Bulletin Committee | Attendance Committee | Programme Committee |
|---|---|---|
| Rtn Yogesh Nandurkar<br>Rtn Shweta Karandikar<br>Ann Yamani Ponkshe<br>Rtn Abhijit Deshpande<br>Rtn. Anand Kulkarni<br>Rtn. Yogendra Natu | Rtn Abhijit Deshpande<br>Rtn Sandip Kulkarni<br>Rtn Shweta Karandikar<br>Rtn Raghavendra Ponkshe<br>Rtn. Anand Kulkarni | Rtn Mandar Purnapatre<br>Rtn Vivek Velankar<br>PP Rtn Sandip Vilekar<br>Ann Asmita Apte<br>Ann Chitra Prabhumirashi<br>Ann Nandini Joag<br>PP Rtn Anil Supanekar<br>PP Rtn Govind Patwardhan<br>Rtn. Ramesh Prabhumirashi |

As a Club Administration Committee Director, I would like to be grateful and thankful to all you have done to take up this responsibility and week after week and every month for the complete year working tirelessly to bring to us Members the unmatched Bulletin and also the Cream of Programmes.

**Thank You again from all the members of the Rotary Club of Pune South you all really make us feel important and wanted as members of our Club.**

## कल, आज और कल

**रो. योगेश नांदुरकर**



व्हिडिओ इथे पाहा...

## बुलेटीन आणि मी

**रो. आनंद कुलकर्णी**

'मला लिहायला जमत नाही पण बुलेटीन तयार करण्यात मात्र मी मदत करेन.' रो.योगेश नांदुरकरने मागच्या वर्षी बुलेटीन टीममध्ये सहभागी होण्यासाठी विचारले तेव्हा मी त्याला हे सांगितले. बघता बघता टीम तयार झाली आणि अडथळे पार करत सुसाट सुटली. सुरुवातीला ऑनलाईन बुलेटीन तयार करणे हे एक आव्हान होते पण रो.अभिजित देशपांडेंच्या अफाट टेक्निकल माइंडमुळे प्रोफेशनल असे बुलेटीन आपण तयार करू शकलो. सगळ्यांना ऑनलाईन बुलेटीन वाचण्याची सवय लावणे हे एक उपआव्हान होते तेसुद्धा पार झाले. माझ्याकडे कलाकारी आणि क्लबकारी अशी दोन सदरे होती. त्यांतल्या कलाकारीकडे माझा ओढा जरा जास्त राहिला. आपल्या मेंबर्सनी अतिशय उत्तम साहित्य वेळोवेळी पुरवून हे सदर ॲक्टिव्ह ठेवले. काव्यपूर्ती स्पर्धेला झकास प्रतिसाद मिळाला त्याचबरोबर 'मेंबर्स ॲक्टिव्हिटी डे' ही संकल्पनासुद्धा उत्तम प्रकारे राबवता आली ज्यामध्ये साप्ताहिक सभेमध्ये आपल्या मेंबर्सचा सहभाग वाढण्यासाठी प्रयत्न केला गेला.

सगळ्यांची एकत्र मोट बांधण्यासाठी रो.योगेश नांदुरकरनी केलेले नियोजन अप्रतिम होते. पहिला अंक प्रकाशित होण्याच्या आधीच रो.योगेशने संपूर्ण सिस्टीम तयार करून ठेवली होती. विविध सदरे, त्यांचे समन्वयक, लेख अपलोड कोठे होणार, त्यांचा रिव्ह्यू झाला आहे हे कसे कळणार, कुठल्या सदरात, कुठले लेख, कुठल्या महिन्यामध्ये येणार यांसाठी एक उत्तम अशी यंत्रणा त्याने तयार केली होती आणि सहयोगीच्या टीमने या सगळ्याला जबरदस्त साथ दिली. व्यासंगी रो.योगेंद्र नातू, हरहुन्नरी रो.श्वेता करंदीकर, युथफूल रो.संजीव ओगले, चौफेर ज्ञान असलेले रो.अभिजित देशपांडे आणि टीममध्ये मिसळून गेलेले प्रेसिडेंट रो.सुदर्शन नातू अशा मस्त टीमबरोबर काम करताना खूप मजा आली. एकच छोटी खंत की करोनाच्या नियमांमुळे टीमला एकत्र भेटून दंगा करता नाही आला. तो आता लवकर करुच.

## बुलेटीन – एक अनुभव

**रो. अभिजित देशपांडे**

**ऐकण्यासाठी क्लीक करा...**

## टीम बुलेटीन– 'आठवणींची साठवण'

**रो. श्वेता करंदीकर**

मागच्या वर्षी साधारणतः याच वेळेला रो. योगेशचा फोन आला आणि त्यानं सांगितलं की तुला 'बुलेटीन टीम'मध्ये ॲड करतोय. मी कॅज्युअली हो म्हणाले. 'आरसीपीएस'मध्ये मी नवीनच असल्यामुळे हे 'बुलेटीन' म्हणजे नक्की काय याची फारशी कल्पना नव्हती.

रो. योगेश, रो. योगेंद्र, रो. अभिजित, रो. आनंद, ॲन यामिनी आणि मी अशी टीम तयार झाली.

काम सुरू झालं खरं पण माझ्यासाठी सगळंच नवीन होतं. बुलेटीन टीमचा चेअरपर्सन असलेल्या योगेशनं कामाची विभागणी करून दिली. सगळेच दमदार खेळाडू असलेल्या या टीममध्ये काम करताना मला अनेक अनुभव

घेता आले आणि त्याद्वारे माझं अनुभवविश्व समृद्ध होत गेलं.

टेक सॅव्ही असलेल्या अभिजीतनं 'जिथे कमी तिथे आम्ही' ही भूमिका कायमच बजावली. त्यानं बुलेटीनची तांत्रिक बाजू सांभाळली. रो. योगेंद्र यांच्या अनेक वर्षांच्या अनुभवाचा पावलोपावली उपयोग करून घेता आला. बुलेटीन आकर्षक होण्यासाठी रो. आनंदने कल्पकतेनं आयोजित केलेल्या विविध स्पर्धांना आपल्या सभासदांकडून भरभरून प्रतिसाद येत होता त्यामुळे काम करायलाही हुरूप येत होता. या सर्वांना चेअरपर्सन म्हणून योगेशने एका माळेसारखं बांधून ठेवलं होतं. प्रेसिडेंट सुदर्शन आणि रो. संजीव अनेक वेळेला योग्य सल्ला देऊन योग्य वाट दाखवत होते.

या सगळ्याचा परिणाम म्हणूनच अतिशय देखणं झालेलं हे बुलेटीन, डिजिटल स्वरूपात प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला सादर करताना एक वेगळाच आनंद मिळत होता.

एक रोटेरिअन म्हणून मला बुलेटीनमध्ये 'भाषेचे महत्त्व', 'नाटक पाहावे करून', 'आठवणीतील पुणे' हे लेख आणि काही कविता सादर करायला मिळाल्या. एका कवितेला बक्षीसही मिळालं.

या वर्षी दोनदा 'टीम बुलेटीन'नं 'चअऊं म्हणजेच 'मेंबर्स ॲक्टिविटी डे' हा कार्यक्रम केला. आपल्या क्लबमधले सगळे सभासद आणि ॲनेट्स यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना वाव देण्यासाठी या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले होते. 'चअऊं'ची आखणी करणं आणि तो कार्यक्रम प्रत्यक्षात उतरवणं यात खूप मजा आली.

मला स्वतःला अतिशय दर्जेदार अनुभव मिळवून देण्याऱ्या या बुलेटीनच्या आठवणींची साठवण करत असताना, मी 'टीम बुलेटीन'चे हार्दिक आभार मानते तसंच आपलं काम अतिशय चोख बजावणाऱ्या 'टीम सहयोगी'चे आणि मुख्यत्वेकरून 'उल्का पासलकर' यांचे आभार मानते. उल्कानं प्रत्येक महिन्याला अगदी न चुकता आम्हाला रिमाइंडर देऊन नेहमीच वेळेत काम केलं.

मला आपल्या या 'सदर्न स्टार'चा एक भाग होता आले याचा आनंद तर आहेच पण त्याहून जास्त आनंद खूप चांगले मित्र मिळाले याचा आहे.

## बुलेटीन मॅजीक...

**रो. योगेंद्र नातू**

सभासदांचा सहभाग असावा म्हणून बुलेटीन कमिटीचे रो.आनंद कुलकर्णी यांनी पहिल्याच अंकाला कविता स्पर्धा ठेवली... कवितेच्या सुरुवातीच्या दोन ओळी देऊन ती पूर्ण करायला सांगितली... ती कविता म्हणजे मृद्‌गंध... या स्पर्धेत मोहिनी नातूंच्या कवितेचा पहिला नंबर आला...

काही झाडांच्या बिया कशा वाऱ्याबरोबर हेलिकॉप्टरसारख्या तरंगत जाऊन दूर कुठेतरी पडतात आणि तिथे रुजतात... जशी काटेसावर ...तशीच ही कवितासुद्धा व्हाट्सॲपद्वारे इकडून तिकडे जात-जात संगीतकार प्रसाद जोशी यांच्यापर्यंत पोहोचली.

त्यांना ती कविता आवडली... तुम्हाला कवितांची गाणी करण्याची इच्छा आहे का अशी त्यांच्याकडून विचारणा झाली... नवीन काहीतरी शिकायला मिळेल अशा धारणेतून त्यांच्याकडे थोड्या कविता पाठवल्या आणि गंमत म्हणजे त्यातून दहा अतिशय सुंदर अशा गाण्यांचा अलबम तयार झाला....

त्याच वेळी सहयोगीचे रो. योगेश नांदुरकर यांनी त्याचं पुस्तक करायची तयारी दाखवली... त्यातूनच 'देणं स्वरूपाचं' हे सुंदर पुस्तक तयार झालं... आणि 'बुक पब्लिशिंग मेड इझी' याचा अनुभव आला...

बुलेटीन कमिटी मनःपूर्वक धन्यवाद!

# कल, आज और कल

**रो. मंदार पूर्णपात्रे**

रोटरी वर्ष २०२०-२०२१ यातील प्रोग्रॅम कमिटीबद्दल लिहावे असे बुलेटीन कमिटीच्या रो. योगेश नांदुरकर यांच्याकडून सुचवण्यात आले. अध्यक्ष रो. सुदर्शन नातू आणि अध्यक्ष निर्वाचित रो.संजीव ओगले यांनी आमच्या कमिटीकडे साप्ताहिक सभेतील विषय, वक्ते यांचे आयोजन, संयोजन करण्याची जबाबदारी दिली. त्यांनी आमच्या कमिटीवर ठेवलेला विश्वास आणि गेले काही वर्षे याच क्षेत्रात काम करण्याचा अनुभव ही आम्हाला मिळालेली उर्जा होती.

सर्वांत अवघड गोष्ट असते ती स्वतःची ओळख स्वतःला असणे आणि स्वतःची ओळख स्वतःला होणे. आमच्या कमिटीबद्दल 'लेखाजोखा' मांडण्यासाठी दुसऱ्या कमिटीने डोळसपणे लक्ष देऊन भाग घ्यायला हवा असे माझे मत आहे. अत्यंत कमी वेळा प्रत्यक्ष उपलब्ध झालेले सभेचे स्थळ, व्यासपीठ, करोना नावाच्या राक्षसाने मांडलेला छळ आणि त्यातून इतरांना उपद्रव होऊ नये यासाठी सदैव दक्ष राहणे खूप गरजेचे झाले होते. प्रत्यक्ष भेटीगाठी आणि वक्ते यांना त्यांच्यासमोर बसून ऐकणे हे खूप कमी वेळा शक्य झाले. 'झुम' व 'फेसबुक लाइव्ह' या आभासी माध्यमांचा वापर करून, तंत्रज्ञानातील मर्यादा सांभाळून-स्वीकारून रंजक तरीही नावीन्यपूर्ण व सर्व सभासदांना उपस्थित राहण्यास प्रोत्साहित करणारी अशी साप्ताहिक सभा आयोजित करणे हे मोठे आव्हान स्वीकारावे लागले. रो. अभिजित देशपांडे यांनी केलेल्या तांत्रिक सहकार्यामुळेच आम्ही हे आव्हान स्वीकारू शकलो याची आम्हाला जाणीव आहे. मी सर्व समन्वयकांचेही आभार मानू इच्छितो. आपल्या क्लबमधील अनेक सभासदांचा आमच्या कार्यक्रम आयोजन-नियोजनातील प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहभाग हा आपल्या क्लबमधील गुणवत्तापूर्ण फेलोशीपचा दाखला आहे. बुलेटीन कमिटीमधील रो. आनंद कुलकर्णी या सेनापती रूपातील नेतृत्वाने सादर केलेल्या 'MAD' या कार्यक्रमाने आपल्या क्लबमध्ये सादर होणाऱ्या 'रमण रजनी, रमणी रजनी व चिल्ड्रेन नाईट' या कार्यक्रमांची उणीव भरून काढली.

फर्स्ट लेडी सुगंधा व सर्व ॲन्स पार्टीसिपेशन कमिटीनेही 'श्रावणसरी', 'नवरात्र स्पेशल' व 'चिल्ड्रेन नाईट' या कार्यक्रमांचे सुरेख आयोजन आणि सादरीकरण केले. सर्वांच्या सातत्यपूर्ण कष्टांना सलाम...! दिवाळी स्पेशल कार्यक्रम हा प्रत्यक्ष सादर झाला असता तर अधिक आनंद झाला असता. काहीसा अनवट परंतु अभिरुचीपूर्ण कलाविष्कार आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा आम्ही मनापासून प्रयत्न केला. दोन वर्षांपूर्वी 'क्लब डे'च्या निमित्तानी सुप्रसिद्ध कवी वैभव जोशी आणि निवेदक मिलिंद कुलकर्णी यांचा कार्यक्रम ऐकण्याची संधी मिळाली होती. या वर्षी आपण प्रत्यक्ष भेटून 'क्लब डे' साजरा करू शकत नाही याचे वाईट वाटत आहे. माहिती आणि तंत्रज्ञानातील प्रगती, कला, साहित्यविश्व, वैद्यकीय क्षेत्राशी निगडीत अशा अनेक विषयांना स्पर्श करून त्यांतील 'सुगंध' आपल्यापर्यंत पोहोचविण्याचा आम्ही प्रयत्न केला. नवीन पिढीला व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांचे विचार ऐकणे, त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रोत्साहन देणे यासाठी विशेष प्रयत्न केले.

प्रासंगिक, व्यावसायिक घडामोडींवर आधारित तसेच जगभर साजरे होणारे 'दिन-विशेष' यांवर समयोचित कार्यक्रम सादर करण्यासाठी वेळ व माध्यमांची कमतरता जाणवली. अजूनही बरेच काही करावयाचे बाकी आहे असे वाटते. आमच्या कमिटीच्या वतीने मी सर्वांचे पुनश्च आभार मानतो आणि पुढील नवीन कमिटीस शुभेच्छा देतो.

*प्रयत्न केले, जे जे समजले ते ते दिले,*
*कधी मागितलेले कधी न कधी मागितलेले ।*

*कमी पडलो असू, परि निष्काळजीपणा न केला,*
*सर्वांच्या सूचनांचा यथोचित सन्मान झाला ।*
*एक वर्ष कमी पडावे एवढे सोडले संकल्प,*
*राबविले यथाशक्ती यथाअवधी प्रकल्प ।*
*खंत एकचि परी उरली मनी,*
*'उपस्थिती' हर सभेस असू द्यावी बरी ।*
*बोलविलेल्या पाहुण्यांचा आदर*
*पाहूणचार, विचारपूस करावी खरी ।*
*गोड मानुनी घेतली असावीत*
आमुची ही सेवा ।
ऐसे विनये सांगतो, मित्रहोऽ
आमुचा रामराम घ्यावा...!

## सद्भावना मेडिकल कॅम्प

**डॉ. विजया गुजराथी**

ऐकण्यासाठी क्लीक करा...

रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथ, आरआयडी ३१३१ मेडिकल अॅव्हेन्यू, बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन आणि भारतीय सैन्य दल यांनी या वर्षी पंधरा एप्रिल ते अठरा एप्रिल या दिवसांत काश्मीरमध्ये मेडिकल कॅम्प घेतला होता त्यासाठी पुण्याहून आम्ही काही डॉक्टर्स आणि स्वयंसेवक तिथं गेलो होतो. अर्थातच आमची राहण्याची व्यवस्था मिलिटरी रेजिमेंटमध्ये करण्यात आली होती. अशा ठिकाणी राहण्याचा अनुभव अगदी अनोखा होता. आयुष्यात असा अनुभव क्वचितच मिळतो. आम्ही डॉक्टर लोक नेहमीच वेगवेगळे आरोग्य उपक्रम, शिबीरं आयोजित करत असता, समाज सेवा करत असतो. आमच्यापैकी काही जणांनी तर परदेशातही कितीतरी कॅम्पस आयोजित केले आहेत. बहुतेक वेळा असा अनुभव थोड्याफार फरकानं सारखाच असतो. सद्भावना मेडिकल कॅम्पमध्ये सहभागी झालेल्या दहा डॉक्टर्सपैकी आम्ही तीन लेडी डॉक्टर्स होतो. एक असिस्टंट हिस्टोपॅथोलॉजी ऑन्कॉलॉजीची टेक्निशियन होती. पुण्यातूनच पाच व्हॉलंटिअर्स आमच्याबरोबर होते. आमच्यातले काही जण आधीच तिथं शिक्षण क्षेत्रात, बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनमध्ये काम करत होते. तेही आमच्या मदतीला होतेच. आमच्या फार्मासिस्ट रोटेरिअनने औषधांची व्यवस्था पुण्यातूनच केलेली होती. डोळ्यांच्या डॉक्टरांनी चष्म्यांची व्यवस्था केलेली होती शिवाय तिथल्या मिलिटरी हॉस्पिटलनंही आम्हाला औषधांचा भरपूर पुरवठा केला त्यामुळे आम्ही सढळ हातांनी रुग्णांना औषधं, चष्मे इत्यादी वाटू शकलो.

काश्मीरमध्ये काम करतानाचा अनुभव मात्र अगदी आगळावेगळा आणि रोमांचक होता.

पहिला कॅम्प होता कमल कोट याठिकाणी कमाल कमान सेतूपासून जवळच ६५००फूट उंचावर. अगदी दुर्गम भाग वळणावळणांनी उंचच उंच जाणारा रस्ता नागमोडी रस्ता... सीमेवरचं शेवटचं गाव त्यामुळे रस्त्यात कुठेही दुकान, इमारती, जाहिराती काही दिसत नाही. तिथं पोहोचलो तेव्हा गावकरी वाटच पहात होते. गंमत म्हणजे स्त्रिया भरपूर असूनही शांतपणे व्यवस्थित ओळीत खुर्च्यांवर बसल्या होत्या. पुरुष मात्र घोळक्यानं धक्काबुक्की करत, गोंधळ करत उभे

होते. थोड्याच वेळात या गावच्या सरपंचांनी कार्यकर्ते आणि मैत्रीचे जवान यांच्या मदतीनं अगदी छान शिस्त लावली.

इथल्या बायका अगदी गोऱ्यापान, नाकेल्या, नितळ कांती पण कुठेतरी आर्थिक परिस्थिती बेताची असल्याची जाणीव करून देणाऱ्या. रोजच्या कपड्यांवर फिरन नावाचा लांबच लांब झगा घातलेल्या आणि पूर्ण डोक्यावर दुपट्टा बांधलेला. पुरुष डॉक्टरांना दाखवायला काय त्यांच्याशी बोलायलाही त्या तयार नव्हत्या पण लेडी डॉक्टरांकडे मात्र अगदी मन मोकळं करत बोलत होत्या. आमच्याकडे आल्यावर कपडे पूर्ण वर करून 'ये यहाँ मेदीमे दर्द होता हैं' म्हणायच्या. गुडघे दुखी तर प्रत्येकीचीच तक्रार. त्याचं कारण अगदी सरळ होतं.

प्रचंड थंडीमुळे अन्नपचनाची क्रिया सावकाश त्यात प्रामुख्यानं सामिष भोजन असल्यानं तेल मसाल्याचा भरपूर वापर त्यामुळे पचनाच्या तक्रारी असायच्याच. घराबाहेर पडणारे पुरुष चक्क स्वतःच्या पोटावर कोळशाची शेगडी बांधून बाहेर पडतात त्याला ते कांगरी असं म्हणतात. शरीरातला अग्नी मंद झाल्यावर त्याला बाहेरून चेतवण्याची कल्पना कुणाला आणि कशी सुचली असेल कोण जाणे पण काही ठिकाणी त्याचाही अतिरेक झालेला बघायला मिळतो. बऱ्याचदा पोटात अल्सर किंवा कॅन्सर झालेले पण बघायला मिळतात ते त्यामुळेच...

सतत थंडी आणि पाऊस यांमुळे सूर्यदर्शन विरळच. साहजिकच विटामिन 'डी'ची कमतरता कमालीची दिसत होती आणि कॅल्शियम सिंथेसिस कमी होऊन तीही कमतरता आहे हे प्रकर्षानं जाणवत होतं. मुलांची संख्या कमीतकमी चारपाच आणि एकंदर परिस्थिती बघता असं लक्षात येतं की एवढी गर्भारपणं, बाळंतपणं होतात पण त्या नाजूक अवस्थेत अतिरिक्त पोषण व्हायला हवं ते या बायकांना मिळत नसावं त्यामुळे कॅल्शियम विटामिन डीची कमतरता असल्यानं गुडघ्यांना पोषण कमी मिळतं... इथं सपाट प्रदेश नाहीच म्हणजे सतत चढउतार त्यामुळे गुडघ्यांवर अधिक ताण पडतो. कमी पोषण आणि जास्त ताण अशा व्यस्त प्रमाणामुळे गुडघे कुरकुर करणारच... मला या ठिकाणी सांगायला अतिशय आनंद वाटतो की जितक्या कॅन्सरच्या तपासण्या केल्या तितक्या सर्वच्या सर्व निगेटिव्ह आल्या. कदाचित बहु प्रसूतिंमुळे असेल पण कर्करोगाचा प्रभाव दिसून येत नाही. उर्वरित भारतात मात्र स्त्रियांच्या कर्करोगाचं प्रमाण अलार्मिंग आहे. खेदाची गोष्ट ही आहे की, ज्या निसर्गानं या प्रदेशावर सौंदर्याची भरभरून लयलूट केली त्यानं सूर्यप्रकाश देताना मात्र हात आखडता घेतला आहे साहजिकच रुग्णांमध्ये ॲलर्जीज, काही त्वचारोग दिसून येत होते. कपडे रोजच्या रोज धुणं किंवा वाळवणं त्यांना शक्यच नाही शिवाय एवढ्या प्रचंड थंडीत रोज अंघोळ, स्वच्छता होत असेल की नाही याबद्दल शंका येते. नेत्रतपासणी करताना त्यांना वाचण्याची वगैरे फार गरज वाटत नव्हती पण डोळ्यांच्या इतर तक्रारींसाठी इलाज केले गेले. चष्मा मिळाल्यावर ते खूश होऊन जात. हा रमादान म्हणजे रमजानचा महिना असल्यानं एक वाजता नमाजाची वेळ म्हणून आम्हीही आमच्या जेवणाची वेळ तीच नक्की केली होती. जेवण झाल्यावर पाहतो तर परत तशीच गर्दी उसळलेली. दिवसभराचा उपवास वरून पावसाच्या सरी असूनसुद्धा ते न कंटाळता येत होते. त्यांचा प्रतिसाद बघून मग आम्हीही आमच्या वेळेचं बंधन सैल करून टाकायचो. आणखी एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे आम्ही पुण्याहून जाताना आमच्या नातेवाईकांच्या मनात करोनाची खूपच धास्ती होती पण अति उंचावर असल्यामुळे किंवा शुद्ध वातावरणामुळे असेल पण प्रदूषण, करोना या गोष्टींचा विसर पडल्यासारखं झालं होतं.

उत्साहानं काम करण्याचा स्वयंसेवकांचा वेग वाखाणण्यासारखा होता. रोटरिअन्सच्या अंगात हे गुण मुरलेलेच असतात. तशीच बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनच्या स्वयंसेवकांची आम्हाला खूप मदत झाली. या तरुणांनी रिसेप्शन काउंटर अतिशय छान हाताळलं होतं. प्रत्येकाचा केसपेपर काढणं, त्याचं वजन, रक्तदाब, रक्तातली साखर तपासणी आणि पुढचं मार्गदर्शन करण्याची जबाबदारी यांनी लिलया पेलली आणि आमचा कामाचा भार चांगलाच हलका केला. भाषेची अडचण आली तर एखाद्या दुभाषाला आमच्याकडे पाठवायचं, कुणाला औषध कळलं नाही तर आम्हाला विचारून समजावून सांगायचं, गरज लागल्यास फार्मसीमध्ये जाऊन यायचं ही कामं बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनच्या स्वयंसेवकांनी सहजतेनं केली. या सगळ्यांत इथल्या कमांडिंग ऑफिसरच्या सूचना आम्हाला खूप उपयोगी पडायच्या.

तिथल्या सरपंचांनी त्यांची व्यवस्थित जाहिरात केलेली असायची आणि त्या ठिकाणी ते जातीनं उपस्थित राहून आम्हाला काय हवं नको ते सगळं बघायचे.

पुढचा कॅम्प होता नवागावला. पुण्यात आमचे पेशंट्स अगदी दूरदूर अंतरावर वेटींग रूममध्ये बसतात, केबिनमध्ये तर एका वेळी एकच पेशंट घ्यायचा आमचा कटाक्ष असतो पण इथं तर एक बाई आत आली की तिच्या बरोबर पाचसहा मुलं, एखाददुसरी बाई किंवा भाषा येत नसेल तर बाप्या अशी टोळीच आत घुसायची. कधीकधी ती मुलं इतकी एकसारखी दिसायची की कुणाला तपासलं आणि कोण बाकी राहिलं असा आमचा गोंधळ उडायचा. अजून कुटुंब नियोजनाचं वारं त्या गावाला पोचलेलंच नाही. एखाद्या बाईला दोनच मुलं असली तर ती अगदी नाराज असायची. एक मात्र मला नमूद करावंसं वाटतं की त्या खूप समाधानी असायच्या. एवढ्या प्रतिकूल परिस्थितीत त्यांचा हा गुण मनाला भावून गेला.

त्यापुढचा कॅम्प होता नौगाम इथं. तिथून पुढे एक चेकपोस्ट आणि जेमतेम पाच किलोमीटर्सवर सीमारेषा. पूर्वी तर या पहाडीतून एक रस्ता काढून तिथून लोक ये-जा करत असत. आता मात्र तो रस्ता पूर्ण बंद केलाय. हा प्रदेश जरा जास्तच सेन्सिटिव्ह आहे त्यामुळे त्याची सुरक्षा जास्तच कडक... इथंच आम्हाला एके-४७ रायफल फोटोपुरती का होईना हाताळायला मिळाली. आज समोरच्या डोंगरावरचा पहारा जास्तच ठेवला होता. आपल्याला मिलिटरीच्या जवानांबद्दल, त्यांच्या कामाबद्दल नेहमीच आदर वाटतो. इतक्या असुरक्षित वातावरणात, बिकट अवस्थेत त्यांचं राहणं बघितलं की तो आदर अनेक अनेक पटींनी वाढतो. संपूर्ण रस्त्यावर अगदी थोड्या थोड्या अंतरांवर सैन्य तैनात असतं. जेमतेम वीस-पंचवीस वर्षं वयाचे हे तरुण तिथं गस्त देत असतात. कडाक्याची थंडी, बोचरे वारे, मधूनच पडणाऱ्या पावसाच्या सरी अशा वातावरणात दहादहा बाराबारा तास एकाच जागेवर उभं राहायचं. कशाचीही तमा न बाळगता आपलं कर्तव्य बजावत राहायचं. माणूस नाही, गप्पा नाही, गोष्टी नाही... सदैव सजग तत्पर. ड्युटीवरून घरी गेल्यावरही घरात कुणी नाही. सीमेवर कुटुंब नेता येत नाही. वर्ष-वर्ष घरी जायचं नाही. कुटुंबीयांची भेट नाही. नातेवाईक, मित्रपरिवार दिसत नाही. कुणी तुम्हाला भेटायला येऊ शकत नाही अशा कष्टप्रद भयावह वातावरणात अशी सेवा बजावणाऱ्यांना आपण फक्त कडक सलाम करू शकतो.

मिलिटरीचे एवढे कष्ट पाहून ऊर अगदी भरून आला. तिथल्या प्रसिद्ध वर्तमानपत्रातून या कॅम्पच्या बातम्या झळकत होत्याच शिवाय टीव्हीवर सविस्तर वर्णन केलं जात होतं त्यामुळे तिथल्या स्थानिक लोकांचा आणि आपला संबंध जोपासण्याची सद्भावना निर्माण केली हे नक्की...

शेवटचा कॅम्प बारामुल्लाला होता. आम्ही तिथं पोहोचलो तेव्हा आम्हाला आश्चर्याचा धक्काच बसला. ते पब्लिक हेल्थ सेंटर असल्यामुळे त्यांच्या तपासणीच्या खोल्या, पॅथॉलॉजी लॅब, रुग्णांसाठी खाटा असा सगळा सरंजाम अगदी अदययावत... पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सर्व सोयी असल्या तरी पेशंट्स मात्र तेवढे दिसत नव्हते. मन हिरमुसलं होतं पण अर्धा तास गेला आणि रुग्णांचा असा ओघ सुरू झाला की सगळ्यांना आवरणं अवघड जात होतं. नंतर लक्षात आलं की ही मंडळी आधी इथं येऊन रागरंग बघून नंतर घरातल्या लोकांना घेऊन येत होती. मात्र इथल्या स्त्रिया त्या मानानं जरा शिकलेल्या, थोडं इंग्लीश येणाऱ्या होत्या ही आनंदाची गोष्ट होती. एकंदरीतच शिक्षणाचं प्रमाण कमी असल्यानं त्यांना स्त्री डॉक्टरांना भेटण्याची संधी कमी होती. एक स्त्री म्हणूनही आमच्याशी बोलायला, त्यांच्या समस्यांवर चर्चा करायला मिळाल्याचं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत होतं.

संध्याकाळी कॅम्पचा सांगता समारंभ झाला. एखाद्या चित्रपटात शोभेल असा प्रशस्त दिवाणखाना, साधेच पण उंची फर्निचर, विविध पदकं, मानचिन्हं यांनी भरलेल्या शोकेसेस, आपल्या आर्मीच्या पराक्रमाची गाथा सांगत होत्या. त्यातले ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे असलेले निवडक फोटो मन वेधून घेत होते.

अशा जादूमय वातावरणात विशिष्ट सेवा मेडल प्राप्त मेजर जनरल वीरेंद्र वत्स यांनी प्रवेश केला आणि

वातावरणात वेगळाच रंग भरला. ३७० कलम रद्द झाल्यावर तिथं भारताचा झेंडा फडकला या प्रसंगाचं वर्णन करताना त्यांच्या चेहरा अभिमानानं फुलून आला होता. ते वर्णन प्रत्यक्ष ऐकताना आमचंही मन आनंदानं भरून आलं. त्यांनी आम्हाला डॅगर्स डिव्हिजनची मानाची टोपी दिली तो प्रसंग आमच्यासाठी सन्मानाचा भाग होता. पुढच्या दोन दिवसांत सद्भावना मेडिकल कॅम्पच्या टीमनी बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनच्या चार होम्सना आणि प्रशिक्षण केंद्रांना भेटी दिल्या. अधिक कदम नावाचा जेमतेम सतरा वर्षांचा एक मुलगा सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून पुण्यात शिकायला आला. रोटरॅक्ट क्लबचा तो सदस्य झाला. सामाजिक शास्त्राचा अभ्यास करताना तो काश्मीरला गेला. फिल्डवर्क करता करता काश्मीरची अशांतता बघून तो इतका अस्वस्थ झाला की तीच त्याची कर्मभूमी झाली. त्यानं तिथं शांततेची बीजं रुजवायला सुरुवात केली. आता त्याची मुळं पक्की झाली आहेत आणि त्याचा वृक्ष होऊ लागलाय.

आपल्या गावात आपलं छोटंसं घर बांधणं हे प्रत्येकाचं स्वप्न असतं. याच्या मनात स्वतःच्या घराचा विचार आलाच नाही. काश्मिरी लोकांच्या मनातच त्यानं असंख्य घरं बांधली. तिथं मुलींकरता अनाथ आश्रम चालू केले पण प्रत्यक्ष बघितल्यावर ‘अनाथ आश्रम’ हा शब्द योग्य वाटत नाही हॅप्पी होम वाटतं. पुण्याहून मेडिकल कॅम्पनिमित्त काश्मीरला गेलो म्हणून आम्हाला या आश्रमांना भेट देण्याची संधी मिळाली. पहिल्या आश्रमाला भेट देताना मनात विचारांचं काहूर उठलं होतं. असंख्य प्रश्न मनात घोंगावत होते. आम्ही गेलो तेव्हा स्वागताला जयादिदी सामोऱ्या आल्या. पहिल्या भेटीतच त्यांनी आमची मनं जिंकून घेतली. इतकं उबदार स्वागत पाहून आम्ही भारावून गेलो. मुलींनी आमच्यासाठी विशेष नाश्त्याची व्यवस्था केली होती. त्यांचा उत्साह बघून आम्हाला खूप आनंद झाला. कोरोनामुळे सध्या फक्त पन्नास टक्के मुलींना इथं राहण्याची परवानगी होती. त्या मुलींनी आमच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. एकेकीची कहाणी ऐकून आपल्या डोळ्यांत पाणी येतं पण त्या या दुःखाला पार करण्याचा प्रयत्न करतात आणि त्यात यशस्वीसुद्धा होतात. त्यांची आपल्याबरोबरची वागणूक आणि आदब बघून त्यांच्या प्रेमात पडायला होतं. इथं थांबण्याची खूप इच्छा असूनही उशीर होत असल्यामुळे आम्हाला तिथून बाहेर पडावं लागलं. दुसऱ्या दिवशी आम्ही एका आश्रमात भेट दिली तिथल्या मुलीही खूप गोड आणि सालस होत्या. दयेनं नाही तर मायेनं त्यांनी आम्हाला आपलंसं करून घेतलं. त्यांनी वेगवेगळी गाणी, प्रार्थना म्हणून दाखवल्या. केवढ्या कठीण परिस्थितीत त्या शिक्षण घेतात हे बघून कौतुक वाटतं. अगदी वय वर्षं दोनपासून या मुली इथं सोडून दिलेल्या असतात. अनंत आर्थिक अडचणी, बाहेर सततचे दंगे, लॉकडाऊन या कारणांमुळे...

अगदी मूलभूत सोयीही नाहीत किंवा किंबहुना तुटपुंजा आहेत... पण संकटांनी घाबरून न जाता त्या स्वावलंबी होण्याचा प्रयत्न करतात. स्वतःच्या पायांवर उभ्या राहतात. जिथं जयादिदींचं घर आहे तिथं आम्ही तिसऱ्या दिवशी गेलो. दिदी कसल्या त्या मुलींच्या आईच आहेत. आईसारखं नव्हे तर आईचंच प्रेम त्यांना देतात. त्या मुलींना शिक्षणाबरोबर यशस्वी आयुष्याचे धडे देतात. त्यांतल्या दिडशे मुलींची लग्नं झाली आहेत. त्या हुशारीनं संसार करतात. सासरी प्रतिकूल परिस्थितीचा सामना करण्याची धिटाई त्यांच्यात निर्माण झाली आहे. वाईट परिस्थिती बदलण्याची त्यांची मानसिक ताकद अतुलनीय आहे. त्यांच्यातल्याच काही मुली तिथं कॉम्पुटर शिकवतात, काही मुली शिवणाचे धडे देतात आणि घेतात. परस्परांना सांभाळून घेत या बिकट आयुष्याची वाटचाल त्या करत आहेत.

आपल्या मुलांना सर्व सोयी उपलब्ध असतात तरी त्यांचं शिक्षण आपल्याला अवघड वाटतं पण या मुलींना कोणतीही कौटुंबिक पार्श्वभूमी नसताना दुसऱ्या शहरात शिक्षण घेऊन त्या डॉक्टर, इंजिनिअर होतात. काही मुली आश्रमाच्या प्रती आदर बाळगून परत तिथंच सेवा रुजू करतात. नवीन मुलींना शिक्षण घेण्यासाठी मदत करतात. शेवटच्या दिवशी आम्ही अनंतनाग आश्रमाला भेट दिली. तिथल्या मुलींनी गरम गरम काहवा आणि स्वतः तयार केलेल्या रोट्यांनी आमचं स्वागत केलं.

प्रत्येक ठिकाणी आम्ही त्यांच्या वैद्यकीय तपासण्या केल्या आणि विशेष म्हणजे फारशा सुविधा नसतानाही या

मुलींचं आरोग्य उत्तम आहे, त्यांचं मानसिक आरोग्य तर फारच उच्च दर्जाचं आहे हे आमच्या लक्षात आलं. त्यांच्याशी बोलताना आम्हाला वाईट वाटलं तर त्या आमची समजूत घालत होत्या.

रमजानचे सतत उपवास सुरू असूनही त्या उत्साही आणि आनंदी होत्या. रामनवमी आणि रमजान असा राम रहीमचा उत्तम योग त्या दिवशी घडून आला. धर्मापलीकडं जाऊन एक कडी जोडण्याचा योग जुळून आला. 'एकमेकां सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' हा धडा शिकायला मिळाला.

तिथं आणखी एक गोष्ट लक्षात आली ती म्हणजे अधिक भैयावरचं त्यांचं प्रेम,श्रद्धा... तो त्यांना नुसतं अन्न, पाणी किंवा इतर मदत करत नाही तर त्यांनी स्वावलंबी आणि परिपूर्ण होण्यासाठी प्रयत्न करतो. तिथल्या अशांत वातावरणातही शिक्षणात सातत्य ठेवण्याचा प्रयत्न करतो. इतकच नव्हे तर दिडशे मुलींची लग्नही त्यांनी लावून दिली आहेत. त्या मुलींची मुलं त्याला आजोबा म्हणतात म्हणून अधिकचा मान वयाच्या चाळीशीच्या आधीच भैयावरून पप्पावर आणि आता आजोबावर गेला आहे. आज त्याची पाच होम्स तिथं आहेत. जम्मूमध्ये अशाच लोकांसाठी आणखी एक अद्ययावत असं मोठ्ठं घर बांधायचं त्याचं स्वप्न आहे. ते लवकरच पूर्ण होवो अशा मनापासून शुभेच्छा! अधिकचं हे काम बघून सगळ्यांना वेगळीच प्रेरणा मिळते. आज स्वतःचा कम्फर्ट झोन आणि प्रायॉरिटीज बाजूला ठेवून लोक बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनचं काम करायला तयार होतात. देशाच्या सीमेलगतच्या खेड्यापाड्यात खूप अवघड परिस्थिती आहे. अतिशय उंच आणि दुर्गम प्रदेश असल्यानं तिथं वैद्यकीय सोयी उपलब्ध नाहीत. त्यांना सेवा देण्याचा प्रयत्न बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन करतं. आम्हा डॉक्टरांना अशाच कॅम्पला जाण्याची संधी मिळाली. बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशन आणि भारतीय सैन्यदलाच्या सहकार्यानं सीमेवर आरोग्य शिबिरं आयोजित केली होती. बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशननी तिथं पंधरा ॲम्ब्युलन्सेस दिल्या आहेत. त्यांची सखोल तपासणी आपल्या तज्ज्ञ डॉक्टरांनी केली. त्यांचं काम बघून आम्ही फार प्रभावित झालो.

आपल्याला माहीत असलेल्या रोटरीच्या चारही टेस्ट्स आम्ही या भेटीत पूर्ण केल्या असं मला वाटतं. आपण सगळे भारताचे रहिवासी आहोत याची जाणीव आम्ही तिथं निर्माण करू शकलो आणि तुम्ही आमचेच आहात, आपण सगळे बहीणभाऊ आहोत हे समजवण्याचा, ही भावना रुजवण्याचा आम्ही छोटासा प्रयत्न केला. हे लोक इतक्या दूर सीमेवर राहतात, त्यांचं जगणं अतिशय खडतर आहे त्यामुळे आपला या देशाशी काही संबंध आहे हे त्यांच्या गावीही नसतं. या मोहिमेला आम्ही सद्भावना यात्रा नाव दिले होते आणि ही यात्रा यशस्वी झाल्यामुळे ते नाव सार्थ ठरले याचं खूप मोठे समाधान आम्हाला मिळालं... हे अविस्मरणीय दिवस आम्हाला आमच्या आयुष्यात अनुभवता आले त्याबद्दल रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१, भारतीय सैन्य दल आणि बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत.


- **अध्यक्ष सुदर्शन संवाद**
- **विविध विभाग संचालक किंवा कमिटी मुख्य संवाद**
- **क्लबमधील विविध प्रोजेक्ट्स, कार्यक्रम, फेलोशिप्स**
- **जावे त्यांच्या क्षेत्रा.../ मागील एखाद्या प्रोजेक्टची गोष्ट**

**तुमचा लेख आवर्जून द्या....**
**समन्वयक**
**आनंद / यामिनी**

**क्लबकारी**

# रोमन साम्राज्य – एक रक्तरंजित साम्राज्य – भाग २

**रो. डॉ. सुभाष देशपांडे**

निरो हा रोमन साम्राज्याचा पाचवा सम्राट आणि कदाचित सगळ्यांत जास्त रक्तपिपासू... त्याच्या अगोदरच्या चार सम्राटांच्या काळात खून, विषप्रयोग हे नेहमीचेच होते. तीन सम्राट अशाप्रकारे मारले गेले. चौथा सम्राट क्लॉडिअस याने त्याची पुतणी अग्रिपिनाशी दुसरे लग्न केले. तिला पहिल्या नवऱ्या पासून झालेला लूसिअस् नावाचा अकरा वर्षांचा मुलगा होता. हाच तो पुढील सम्राट निरो होय. निरो सत्तेवर यावा म्हणून अग्रिपिनाने हत्याकांड सुरू केले. स्वतःचा नवरा सम्राट क्लॉडिअसलासुद्धा विषप्रयोगाने मारले आणि इतर दावेदारांना बाजूला सारून आपल्या मुलाला निरोला सम्राट म्हणून घोषित केले. लवकरच अग्रिपिना आणि निरो या दोघांमध्ये मतभेद सुरू झाले आणि अग्रिपिनाने मृत क्लॉडिअसचा पहिला मुलगा ब्रिटानीकस् हा सम्राट होण्यास जास्त लायक आहे असे घोषित केले. निरोने एका मेजवानीमध्ये ब्रिटानीकसला विषप्रयोगाने मारले. अग्रिपिना निरोच्या महत्त्वाकांक्षेमध्ये अडसर होती म्हणून ५९ साली निरोने आपल्या आईचा काटा काढला. असे म्हणतात की जेव्हा मारेकरी अग्रिपिनाला मारावयास आले तेव्हा तिने मारेकऱ्यांना आपल्या ओटीपोटात सुरा खुपसायला सांगितले कारण निरोचा जन्म तेथून झाला होता. निरो अत्यंत विलासी होता. त्याला अभिनयाची आणि संगीताची आवड होती. निरोचे लग्न मृत सम्राट क्लॉडिअसची मुलगी आणि ब्रिटानिकसची बहीण ऑक्टोव्हिआबरोबर झाले होते. निरोला त्याची प्रेयसी पॉपीबरोबर करावयाचे होते म्हणून त्याने त्याच्या वीस वर्षे वयाच्या पत्नीला ऑक्टोव्हिआला ठार मारले. १९ जुलै ६४ साली रोममध्ये एका लहानशा दुकानाला आग लागली आणि म्हणता म्हणता सर्वत्र पसरली. रोम नऊ दिवस जळत होते. निरो त्यावेळेस रोमपासून तीस मैलांवर होता. त्याने लगेच सर्व सूत्रे हातांत घेऊन आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. आग विझविल्यानंतर त्याने रोमची पुनर्बांधणीसुद्धा केली. त्यांमध्ये स्वतःचा पण हात धुवून घेतला आणि एका अद्वितीय अशा सोनेरी राजवाड्याची उभारणी केली या सर्व गोष्टींकरिता अमाप पैसा लागला जो रयतेकडून वसूल करण्यात आला त्यामुळे रयत आणि उमराव दोघेही नाराज झाले. निरोच्या हत्येचा कट शिजला पण त्याचा पत्ता निरोला लागला. शेकडो लोक मारण्यात आले किंवा त्यांनी आत्महत्या केल्या. त्यानंतरही निरोने हत्याकांड चालूच ठेवले. स्वतःची पत्नी आणि तिच्या पोटातील मूल निरोने लाथाबुक्क्यांनी मारले. राज्यात सर्वत्र बंडाळी सुरू झाली. सर्वांनी निरोशी प्रतारणा केली. निरोच्या खर्चिक स्वभावामुळे रोमन साम्राज्य आर्थिक अडचणीत सापडले होते. पैशांची कमतरता भागवण्यासाठी निरोने त्यावेळेस रोमन साम्राज्यात असलेल्या ज्युदाई उर्फ ज्यू समाजाच्या प्रदेशांमधून मोठ्या प्रमाणात कर रुपाने पैसा गोळा केला. त्याचबरोबर ज्यू समाजाच्या सर्वांत पवित्र देवळाच्या खजिन्यातील चांदी-सोने लूटले गेले त्यामुळे ज्यू समाज बंड करून उठला. बंड शमवण्यासाठी रोमन सैन्य पाठविण्यात आले. जवळजवळ ३००० लोकांची हत्या करण्यात आली. सार्वजनिक लूट करण्यात आली ६६ सालच्या मे महिन्यापर्यंत ज्यू समाजाचे बंड चालूच राहिले. ६६ सालच्या ऑक्टोबर महिन्यात रोमन सैन्य ज्यू सैन्याच्या सापळ्यात सापडले आणि त्यांचे ६००० सैनिक मारले गेले. निरोने व्हेसपासिअन् आणि त्याचा मुलगा टायटस् यांच्या नैतृत्वाखाली ६०,००० सैनिक ज्युडाई प्रांतात पाठवले. ६७ सालापर्यंत ४७ दिवसांच्या लढाईनंतर जोटपाटा किल्ला रोमन सैन्याने जिंकला. रोमन सैन्याने दहशत बसविण्याकरिता ज्युंची सररास कत्तल केली. तारीची येथे ६००० ज्यू मारले गेले आणि ३१,००० ज्युंना गुलाम म्हणून विकले. गामला येथे ४००० ज्यू मारले गेले तर ५००० ज्यू लोकांनी एका दरीत उड्या मारून आत्महत्या केल्या.

८ जून ६८ साली निरोने स्वतःच्या मानेत सुरा खुपसून आत्महत्या केली त्यावेळेस तो एकोणचाळीस वर्षांचा होता. अशारितीने क्रूरकर्मा निरोचा शेवट झाला.

जून ६८ साली निरोने आत्महत्या केली आणि रोमन साम्राज्यात गोंधळ माजला. ९ जुलै ६९ साली व्हेस्पासिअनला रोमन साम्राज्याचा सम्राट म्हणून घोषित केले गेले. रोमन साम्राज्यात परत यादवी सुरू झाली. त्यात व्हेस्पासिअनचा विजय झाला. या यादवीत हजारो रोमन ठार झाले. व्हेस्पासिअनने आपला मुलगा टायटसला ज्युडाईमधील मोहिमेचा प्रमुख नियुक्त केले. मार्च ७० साली टायटसने जेरूसलेमवर हल्ला केला. जेरूसलेमभोवती एक तटबंदी बांधण्यात आली ज्यामुळे ज्यू लोकांची उपासमार सुरू झाली. जेरूसलेमच्या पवित्र देवळापर्यंत जाण्यास रोमन सैन्याला तीन महिने लागले. ज्यू सैन्याची आणि नागरिकांची सररास कत्तल करण्यात आली. पवित्र देऊळ संपूर्ण लुटले गेले आणि भस्मसात केले. देवळातील खजिना लुटला गेला आणि त्याला आग लावली गेली. त्या आगीत हजारो स्त्रिया आणि मुले बळी पडली. रस्त्यांवर प्रेतांचा खच पडला होता. ११ लाख ज्यू मारले गेले. ९७००० गुलाम केले गेले. ७४ सालापर्यंत उरलेल्या बंडाळीचा बिमोड करण्यात आला. मासदा येथे ९६६ बंडखोर ज्यू एका दुर्गम किल्ल्यातून लढले पण शेवटी सर्वांना आत्महत्या करावी लागली.

जेव्हा टायटस रोममध्ये आला तेव्हा त्याचे जंगी स्वागत करण्यात आले. लुटलेल्या पैशांतून ८० साली जगप्रसिद्ध कोलोसियम् बांधण्यात आले. त्याच्या एका कोपऱ्याजवळ एक कमान बांधण्यात आली ज्यामधे जेरूसलेमच्या लुटीची शिल्पे आहेत. ही दोन्ही बांधकामे अजूनही उभी आहेत आणि आपल्यापैकी कित्येकांनी बघितली आहेत.

अकरा ऑगस्ट ११७ साली चौदावा सम्राट हाड्रियन् सिंहासनावर बसला. त्याच्या २१ वर्षांच्या कारकिर्दीत रोमन साम्राज्यात शांतता आणि सुबत्ता नांदली. ही सुबत्ता पुढील १४० वर्षे चालू राहिली. २३५ ते २८५ या वर्षांत रोमन साम्राज्यावर अनेक आक्रमणे झाली. २८५ साली डायक्लेशीयन् रोमन साम्राज्याचा सम्राट बनला. त्याने अनेक सुधारणा केल्या. त्यामधील एक म्हणजे साम्राज्य चार भागात विभागले आणि चार सम्राट नेमले. दोन मुख्य आणि दोन दुय्यम सम्राट.

६६ सालापासून निरोच्या काळात ख्रिश्चनांचा जो छळ चालला होता तो डायक्लेशीयनच्या काळात शिगेला पोहोचला. ३०५ साली डायक्लेशीयनने सत्ता सोडली आणि त्याने स्थापलेल्या चार विभाग आणि चार सम्राट या पद्धतीचा बोजवारा उडाला. ३०६ साली एक मुख्य सम्राट कॉनस्टंटिअस् मृत्यू पावला आणि त्याचा मुलगा कॉनस्टन्टीन त्याच्या जागी पश्चिम भागाचा सम्राट म्हणून निवडून आला. पुढील सहा वर्षे पूर्व आणि पश्चिम सम्राटांमध्ये सत्तेकरता संघर्ष चालू राहिला. पश्चिमेकडील सम्राट कॉनस्टंटीनने पूर्वेकडील सम्राट मॅक्सेनशिअस् विरुद्ध युद्ध पुकारले आणि रोमन साम्राज्यात परत यादवी सुरू झाली. मॅक्सेनशिअसच्या सैन्यात एक लाख सैनिक होते तर कॉनस्टंटीनजवळ चाळीस हजार सैनिक होते परंतु विशेष म्हणजे कॉनस्टंटीनच्या सैन्यात ख्रिश्चन सैनिक होते कारण कॉनस्टंटीनला ख्रिश्चनांविषयी सहानुभुती होती. २८ ऑक्टोबर ३१२ साली कॉनस्टंटीनने मॅक्सेनशिअसचा पराभव केला आणि रोमन साम्राज्यात ख्रिश्चन धर्म सुरू झाला.

३९३ साली पूर्वेकडील सम्राट म्हणून कॉनस्टंनटीनचा मेव्हणा लिसिनिअस् याची नियुक्ती झाली. कॉनस्टंनटीन आणि धर्माने रोमन असलेल्या लिसिनिअसमध्ये धार्मिक समझोता होता. तो समझोता ३१६ साली मोडला गेला आणि त्या दोघांत युद्ध सुरू झाले. ३२४ साली लिसिनिअसचा पराभव झाला. लिसिनिअस् आपल्या पत्नीच्या आणि कॉनस्टनटीनची बहीण कॉनस्टनटीनच्या सांगण्यावरून सम्राटाला शरण गेला. त्या युद्धात एक लाख सैनिक मारले गेले. एका वर्षातच कॉनस्टनटीनने आपल्या मेव्हण्याला आणि नऊ वर्षांच्या भाच्याला फासावर चढवले. ३२६ साली कॉनस्टनटीनने आपली पत्नी फॉसटा आणि पहिला मुलगा क्रिसपस् यांची हत्या केली. कॉनस्टनटीनने कॉनस्टंटीनोपल म्हणजेच इस्तांबूलची स्थापना केली. कॉनस्टनटीन २२ मे ३३७ साली मृत्यू पावला.

सन ४७६ मध्ये जर्मन राजा ओडोव्हकर याने साम्राज्य खालसा केले आणि पश्चिम रोमन साम्राज्याचा शेवट

झाला. पूर्व साम्राज्य आणखीन एक हजार वर्षे चालू राहिले १२०० वर्षे सलग तग धरलेल्या साम्राज्याचा असा शेवट का झाला असावा? याचे मुख्य कारण म्हणजे बार्बारिअन जमातींनी रोमन साम्राज्यावर केलेले सततचे हल्ले हे असावे. सन ३७८ ते ४७६ या शंभर वर्षांत बार्बारिअननी पश्चिम साम्राज्य अगदी खिळखिळे करून टाकले होते. बार्बारिअन म्हणजे जे रोमन भाषा बोलत नाहीत आणि म्हणून ज्यांचे बोलणे रोमन लोकांना बडबड केल्यासारखेच वाटायचे ते... आपल्याकडील बडबड हा शब्द बार्बारिअन या शब्दावरून आला का? गोथ, व्हॅन्डाल, ॲलन, सुएव्ही, वगैरे समाज बार्बारिअन म्हणून ओळखले जात असत.

सन ३७६च्या सुमारास आजच्या बल्गेरिया आणि रूमानिया दरम्यान दोन लाख गोथ लोक रोमन साम्राज्यामध्ये स्थलांतर करण्यासाठी जमले होते. त्यांना त्यांच्या प्रदेशातून हून लोकांनी हाकलून दिले होते. हे हून मंगोलियामधून आले होते. हिंदुस्थानाच्या इतिहासातसुद्धा हून लोकांचा उल्लेख आहे. आज युरोपमधे जे स्थलांतर चालू आहे त्याचा हा एक नमुनाच होय. ३७६-३७७ सालांत या निर्वासितांचे खूप खूप हाल झाले. ३७७ ते ३८२ सालांत गोथ आणि रोमन सैन्यांत लढाया झाल्या. ९ ऑगस्ट ३७८ साली तुर्कस्तानातील एडीर्न येथील लढाईत रोमन सैन्याचा पराभव होऊन १३००० रोमन सैनिक मारले गेले. या गोथिक सैन्याच्या सेनाप्रमुखाचे नाव ॲलरिक असे होते.

४०८ साली ॲलरिकने इटलीवर हल्ला केला आणि एकामागून एक शहरे काबीज केली. त्यानंतर त्याने रोम शहराला वेढा घातला. तीन दिवसांकरिता वेढा उठविण्यासाठी ॲलरिकने रोमकडून प्रचंड खंडणी उकळली. सरतेशेवटी २४ ऑगस्ट ४१० साली गोथिक सैन्याने रोम शहरावर हल्ला केला आणि रोम शहर लुटण्यात आले. ख्रिश्चन देवळांना हात लावण्यात आला नाही परंतु इतर धर्मांची देवळे लुटण्यात आली. स्त्रियांवर, मुलींवर अत्याचार झाले. जे पळून गेले ते वाचले... जे हातांत सापडले त्यांची हत्या करण्यात आली. ४१० साली ॲलरिक मृत्यू पावला.

३७६ सालापासून हून समाजाच्या आक्रमणांमुळे रोमन साम्राज्याचा ऱ्हास सुरू झाला होता. हून लोकांनी ॲटिली द हून या सेनापतीच्या नैतृत्वाखाली ४३० साली परत परत रोमन साम्राज्यावर आक्रमणे केली. सन ४५२ पर्यंत हून सैन्य मिलान शहरापर्यंत आले परंतु वाटेत ॲटिलाचे निधन झाले. आतापर्यंत फ्रान्स, स्पेन, उत्तर अफ्रिका हे प्रदेश निरनिराळया बार्बारिअन्सच्या ताब्यात गेले होते. खरेतर पश्चिम रोमन साम्राज्य आता रोमन सम्राटांच्या ताब्यात राहिले नव्हते. ते ओडोव्हकर या जर्मन राजाच्या ताब्यात होते. त्याने पश्चिम साम्राज्य खालसा केले आणि पश्चिम सम्राटाची राजवस्त्रे पूर्व सम्राट झेनो याच्याकडे पाठवून दिली. अशारितीने २७७३ वर्षांपूर्वी रोम्युलस् आणि रिमस् या जुळ्या बंधूंनी स्थापलेले साम्राज्य १२२९ वर्षांच्या रक्तरंजित प्रवासानंतर संपुष्टात आले.

## 'गंध' पुण्याचा गेला सांगून...

**रो. अरविंद शिराळकर**

ऐकण्यासाठी क्लीक करा...

देवानं दिलेल्या इंद्रियांपैकी चार इंद्रियांच्या साहाय्यानं माणूस आस्वाद घेऊ शकतो. डोळ्यांनी पाहून, कानांनी ऐकून, तोंडानं चव घेऊन आणि नाकानं गंध (वास) घेऊन. एखाद्या अस्सल पुणेकराचे डोळे आणि कान बंद करुन जर त्याला पुण्याची सफर घडवली तर तो त्याला नाकानं जाणवणाऱ्या त्या त्या परिचित गंधांवरुन ते ते ठिकाण हमखास सांगू शकतो...

मी हा प्रयोग एकदा केला. एका अस्सल पुणेकर मित्राच्या डोळ्यांवरून आणि कानांवरून काळी पट्टी बांधून त्याला पुण्यातल्या अनेक ठिकाणी गाडीवरुन उलटंसुलटं फिरवलं. मी जिथं-जिथं त्याला घेऊन गेलो त्या-त्या ठिकाणाबद्दलची पोपटासारखी 'अचूक उत्तरं' त्यानं मला दिली...

पहिल्यांदा त्याला फर्ग्युसन रोडवरच्या एका सुप्रसिद्ध हॉटेलसमोर नेलं. येणाऱ्या सांबाराचा गंध घेऊन तो छातीठोकपणं

बोलला, मवैशाली!'

तिथून त्याला गुडलककडं आणल्यावर कॉफीचा टिपिकल वास घेऊन तो म्हणाला, मरूपाली!' आपटे रोडला घेऊन गेल्यावर गरमगरम पॅटीसच्या वासावरुन त्यानं ओळखलं, मसंतोष बेकरी!' डेक्कनच्या छोट्या पुलावरून जाताना नदीचा तो वास आल्यावर त्यानं माझ्या कानात हळू आवाजात सांगितलं, मभिडे पूल' तिथून शनिवारात गेल्यावर मिरची, हळद, शिकेकाई, वेखंड, या दळणांच्या संमिश्र वासावरुन तो ओरडला, मअरे मित्रा, हेच ते ठिकाण जिथं या मसाल्याच्या वासानं पुणेरी स्त्रियांच्या नाकांचे शेंडे लाल होतात... राजमाचिकर गिरणी.'

जुन्या प्रभात टॉकीजच्या चौकात त्याला एका दुकानापुढं उभं केलं, नव्या कोऱ्या पुस्तकांचा गंध त्याच्या नाकात शिरल्यावर तो म्हणाला, मअप्पा बळवंत चौक' कुंटे चौकात त्याला घेऊन गेल्यावर नव्या कोऱ्या साड्यांच्या वासावरुन त्यानं ओळखलं, महा तर लक्ष्मी रोड!' सिटीपोस्टकडून पुढच्या चौकात गेल्यावर अत्तरांच्या वासांवरुन तो पुटपुटला, मसोन्या मारुती चौक!'

तिथून रविवार पेठ रेल्वे बुकींग ऑफिसकडे गेल्यावर उदबत्त्यांच्या येणाऱ्या वासांवरून तो म्हणाला, मविठ्ठलदास सुगंधी.' गणेशोत्सवात दहा दिवस जिथं दगडूशेठ हलवाई गणपती असतो तिथं गेल्यावर चक्क्याच्या, खव्याच्या वासांवरून त्यानं ओळखलं की आपण बुधवार पेठेतल्या दत्त मंदिराजवळ आहोत. निंबाळकर चौकात आल्यावर तो वासावरुनच मिटक्या मारत म्हणाला, मसुजाता मस्तानी!' नेहरु चौकातल्या कोपऱ्यावरच्या दुकानापुढं उभं राहिल्यावर येणाऱ्या भट्टीतल्या ताज्या फुटाण्यांच्या वासावरून त्यानं सांगितलं, मगिरे फरसाण.' कांद्याबटाट्याच्या वासावरून तो म्हणाला, मआपण जुन्या आणि नव्या मंडईच्या मधे आहोत.' टिळक रोडवरच्या टिळक स्मारक चौकात गेल्यावर त्याला अस्सल 'पुणेरी' जेवणाचा गंध जाणवला आणि तो म्हणाला, मबादशाही बोर्डींग.' एव्हाना पेट्रोल भरण्यासाठी मी नेहमीच्या ठिकाणी गेलो तेव्हा या पुणेकराच्या तोंडून शब्द बाहेर पडले, मकुलकर्णी पेट्रोल पंपाशिवाय पुणेकरांना पर्याय नाही'. पेट्रोल भरल्यानंतर मी कुमठेकर रस्त्याला वळलो. तिथून जाताना येणाऱ्या तांबड्या रस्याच्या वासावरून हा शुद्ध शाकाहारी मला सांगू लागला, मआवारे मटनाची खानावळ!' मला चहाची तल्लफ आली आणि मी चिमणबागेत चहासाठी गाडी लावली. तिथं येणाऱ्या चहाच्या वासावरून यानं ओळखलं 'तिलक'चा चहा!

गणपती चौकात गेल्यावर जोगेश्वरी देवीकडे जाताना याच्या नाकाला टिपिकल दक्षिण दावणगिरी डोश्याचा वास आला आणि हा म्हणाला, मशितळा देवी'च्या इथला लोणी स्पंज डोसा मला फार आवडतो.' त्याला केसरी वाड्यासमोर घेऊन गेल्यावर येणाऱ्या बटाटेवड्याच्या वासावरून त्यानं ओळखलं... तो म्हणाला, ममित्रा, आलोच आहोत तर 'प्रभा विश्रांती गृह'मधून पार्सल घेऊयात ना!' मी पार्सल घेतलं आणि मुंजाबाच्या बोळात वळलो तर तिथं येणाऱ्या वासावरून या पठ्यानं ओळखलं, मबेडेकर मिसळसेंटरमध्ये गर्दी आहे का रे?' मी त्याला किती तरी ठिकाणी घेऊन गेलो त्यानं सर्व ठिकाणं बरोबर सांगितली... मला त्याचं कौतुक वाटलं. आपल्यालाही पुणं माहिती आहे मात्र न बघता, न ऐकता आणि न खातापिता फक्त वासावरुनच अखखं पुणं ओळखणाऱ्याच्या रक्तातच पुणं आहे, तोच 'खरा पुणेकर'...


- सभासदांचा सहभाग वाढावा हा हेतू
- सभासदांच्या कलागुणांना वाव
- चित्रकला, फोटोग्राफी, कथा, लेख, कविता
- व्यक्तिगत, कौटुंबिक, व्यावसायिक गवसणी


**कलाकारी**

तुमचा लेख आवर्जून द्या....
समन्वयक
आनंद कुलकर्णी / यामिनी पोंक्षे

# वाळूत उमललेलं फूल

**डॉ. गीतांजली पुरोहित**

ऐकण्यासाठी क्लीक करा...




१९ फेब्रुवारी २०१९च्या वर्तमानपत्रात कंजार भाट समाजातल्या 'सुशिक्षित वराने केली वधूची कौमार्य चाचणी' ही बातमी वाचून मी अत्यंत व्यथित झाले होते. लग्नाच्या पहिल्या रात्री पांढऱ्या चादरीवर पडलेले रक्ताचे डाग जातपंचायतीतल्या लोकांना दाखवून वधूचं कौमार्य निश्चित करणं अन्यथा तिला व्यभिचारी ठरवून दंड देणं, ही ती पद्धत! आज एकविसाव्या शतकात विश्वाचा जो वारू सर्व दिशांना प्रगतिपथावर घोडदौड करतो आहे तो मानवी भावनांशी येऊन मात्र कसा अडखळतो आहे याचं हे ताजे उदाहरण आहे.

योगायोगानं काही दिवसांपूर्वी 'वाळूत उमललेलं फूल' हे पुस्तक वाचलं आणि त्याची पुनःश्च उजळणी झाली. या पुस्तकाची नायिका 'वारीस' हिचं खूप कौतुक वाटलं आणि एक स्त्री म्हणून तिच्या हृदयीची यातना मनाला चटका लावून गेली. लेखक डॉ.श्रीकांत मुंदरगी यांनी ही कहाणी आपल्यापर्यंत पोहोचवली त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार...! आज स्त्री आणि पुरुष समान भावनेनं खांद्याला खांदा लावून आयुष्याचा आनंद घेत आहेत असं चित्र आपल्याला दिसत असलं तरी जगाच्या पाठीवर कुठेतरी अजुनही स्त्रियांवर अमानुष अत्याचार करणाऱ्या चालीरिती सुरुच आहेत ही वस्तुस्थिती आहे. स्त्रियांवरच्या अत्याचाराला वाचा फोडणाऱ्या अशा वारीसची कथा तुम्ही वाचायलाच हवी असं मला वाटलं...

सोमालिया म्हटलं की आठवतात ते फक्त सोमालियन पायरेट्स म्हणजेच समुद्री चाचे! बाकी जगाच्या पाठीवर हा देश नक्की आहे तरी कुठे हे देखील बहुतेकांना माहीत नसतं. सोमालिया इतका गरीब देश आहे की तिथल्या खेड्यापाड्यातल्या जनतेला आधुनिकतेचा स्पर्श सोडा अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांचीही वानवा आहे इतकं दारिद्र्य...! 'शिलिंग' हे या देशाचं चलन आहे; जे जगात कुठेही चालत नाही. मूळ सोमाली रहिवासी म्हणजे काळे आफ्रिकन लोक. इथं सोमाली ही अगम्य भाषा बोलली जाते. इथले बहुतेक लोक सुन्नी मुस्लीम आहेत. इटलीनी एकेकाळी इथं बस्तान बसवण्याचा प्रयत्न केला पण त्या वाळवंटात ना तेल सापडलं ना खनिजं त्यामुळे त्यांनी जरी काढता पाय घेतला तरी आजही इथल्या काही शहरांत अरेबिक, इटालियन आणि इंग्लीश भाषा बोलल्या जातात. 'मोगादिशू' ही आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर वसलेली सोमालियाची राजधानी...! काही शहरं सोडल्यास इथं क्षितिजापर्यंत पसरलेल्या रुक्ष, वैराण अशा वाळवंटात टोळीवाल्यांच्या पाच-पन्नास खोपटी असलेल्या छोट्या छोट्या

वस्त्या असतात; या टोळ्या आजूबाजूची पाण्याची डबकी संपली की सतत पाण्यासाठी नव्या जागेच्या शोधात भटकत राहतात.

'वाळूत उमललेलं फूल' हे पुस्तक आपल्याला वर्षानुवर्षं दुष्काळानी ग्रस्त आणि त्रस्त झालेल्या सोमालियासारख्या देशातल्या एका छोट्या वस्तीतल्या एका खोपटात जन्मलेल्या वारीस डेअरी या मुलीची कथा सांगतं.

१९६५ साली गायकोया नावाच्या वस्तीत दारिद्र्यानं गांजलेल्या मातापित्यांच्या पोटी वारीसचा जन्म झाला. खाण्याचीच वानवा असल्यानं आईचं दूध आटल्यावर घरातल्या चार शेळ्यांचं दूध आणि दुष्काळामुळं त्यांनीही दूध द्यायचं बंद केल्यावर उंटीणीचं आंबट खारट दूध पिऊन वारीस मोठी होत होती. मोहाच्या दारूची धुंदी उतरल्यावर बापानी एखादा पक्षी, ससा मारून घरी आणलाच तर कधीतरी मेजवानी असायची अशी एकूण परिस्थिती!

कळू लागल्यापासून वारीस शेळ्या चरायला घेऊन जाऊ लागली. झुडपं आणि पाण्यासाठी शेळ्या जशा धावत तशी वारीसही त्यांच्या मागे मैल अन् मैल धावायची त्यामुळे दिवसा रणरणतं ऊन आणि रात्री कडाक्याची थंडी अशा विषम हवामानात ती तावून सुलाखून निघत होती. दोन-दोन दिवस उपाशी राहणं किंवा चोवीस तास पाण्याविना काढणं या तिच्यासाठी अगदीच किरकोळ गोष्टी होत्या पण त्यामुळे तिचं शरीर काटक आणि निरोगी बनलं होतं. आफ्रिकन असली तरी ती अगदी काळी नव्हती तर तिनं वडिलांचा सावळा रंग आणि आखीवरेखीवपणा उचलला होता. जंगलात वाढल्यानं भीती कशी ती तिला ठाऊक नव्हती. वारीसला शाळा म्हणजे काय असतं तेही माहीत नव्हतं पण तिच्या मनात अनेक प्रश्न आणि डोळ्यांत असंख्य स्वप्नं होती.

सोमाली स्त्रियाच जरी कुटुंब चालवत असल्या तरी त्यांच्या मताला मात्र घरात काडीची किंमत नव्हती. अखेरचा निर्णय पुरुषाचाच असे! एक दिवस वारीसच्या बापानं वयानं बऱ्याच मोठ्या आणि चार पोरं असलेल्या इसमाबरोबर वारीसचं लग्न ठरवलं कारण या बदल्यात तो पाच उंट आणि पंचवीस शेळ्या देणार होता. वारीसचं मन बंड करून उठलं! मुलीवरच्या प्रेमाखातर रात्री बाप झोपल्याची खात्री करून आईनं वारीसला उठवलं आणि म्हणाली; ''हीच ती अखेरची संधी! आता नाही तर कधीच नाही! मला तुझ्या आयुष्याचं वाळवंट होऊ द्यायचं नाही. यापुढे तू आणि तुझं नशीब!''

वारीस जिवाच्या आकांतानं पूर्वेकडं धावत सुटली. अंधारातून मार्ग काढत, अन्न पाण्याविना, ऊन, थंडी, वाटेतली हिंस्त्र श्वापदं हे सगळे अडथळे पार करून ती मोगदिशूला पोहोचली. पाण्यासाठी वणवण भटकणाऱ्या वारीसचे डोळे समुद्राचं अथांग पाणी पाहून आश्चर्यानं विस्फारले. नशिबानं वारीसला तिथं तिची मावशी भेटली. मावशीचे यजमान सोमालियाचे राजदूत म्हणून इंग्लंडला निघाले होते. त्यांनी घरकामासाठी वारीसला आपल्याबरोबर घेतलं. नशीब वारीसला लंडनला घेऊन आलं. तिथल्या भव्य महालात राहताना स्वर्ग म्हणतात तो हाच असेल असं तिला वाटलं. तिथं देखील दिवसभर कष्टाचं जीवन असलं तरी पोटभर खायला मिळत होतं आणि पाण्यासाठीची वणवण नव्हती याचाच तिला कोण आनंद होता. मुदत संपल्यावर मावशीच्या कुटुंबाला सोमालियाला परतावं लागलं... पण वारीसनी परत मायदेशी न जाण्याचा निर्धार केला आणि स्वतःचा पासपोर्टच लपवून ठेवला. आयुष्याची निम्मी लढाई तिनं तिथंच जिंकली! इंग्लंडमध्ये एकटीनं निभावून नेणं सोपं नव्हतं. इंग्लीश भाषा येत नसताना, वर्क परमिट नसतांना, विविध नोकऱ्या करत, धडपडत ती नशीब आजमावत राहिली. एक दिवस पोटाची भूक भागवायला चार पैसे मिळतील म्हणून धैर्य एकवटून एका अनोळखी फोटोग्राफर समोर ती फोटो काढायला उभी राहिली... आणि वारीसचा फोटो १९८७च्या 'पिरेल्ली' कलेंडरच्या मुखपृष्ठावर छापला गेला. जगाच्या कानाकोपऱ्यांतून आलेल्या हजारो छायाचित्रांतून अशी निवड होणं हा फॅशनच्या जगतातला सर्वोच्च सन्मान समजला जातो. पाहतापाहता वारीस जगप्रसिद्ध मॉडेल झाली. 'वाळूत उमललेलं फूल' या पुस्तकात वारीसची हीच 'मेड टू मॉडेल' कहाणी वाचताना आपण आवाक होऊन जातो. थोड्याच कालावधीत रॅग्ज टू रीचेस ही अशक्यप्राय वाटणारी तिची कथा जगात सर्वश्रुत झाली.

वारीसनी आजवर फक्त अपमान आणि अवहेलनाच सोसली होती पण आज कौतुकाचा प्रपात तिच्यावर कोसळत होता. पिरेल्लीनी तयार केलेल्या त्यावर्षीच्या कॅलेंडरवर फक्त कृष्णवर्णीय स्त्रियांचे फोटो होते. त्यांतील इतर स्त्रिया फॅशनच्या आणि ॲक्टिंगच्या जगात आधीच प्रसिद्ध होत्या. बट वारीस वॉज अ न्यू ब्राईट स्टार बॉर्न फ्रॉम द ब्लॅक होल! सोमालियात खरा पाऊस देखील कधीतरीच पडत असे आणि तो ही भुरभुर पडत असे आणि आज वारीसवर पैशांचा धोधो पाऊस कोसळत होता. 'वारीस' म्हणजे वाळवंटात उमलणारं एक केशरी रंगाचं फूल! वैराण वाळवंटात उमललेल्या या फुलाचा सुगंध आता जगभर दरवळू लागला होता.

वारीसला आता आपल्या मायभूमिची आणि आपल्या जन्मदात्या आईची आठवण दाटून येत होती. वारीसला हे सर्व वैभव तिच्या आईला दाखवायचं होतं. आईमुळेच आपल्याला हे भाग्य लाभल्याची तिची दृढ भावना होती... पण सोमालियातल्या त्या विस्तीर्ण वाळवंटात एका छोट्या भटक्या टोळीतल्या तिच्या आईला शोधायचं तरी कसं? मग भेटली का तिला तिची आई? पुस्तक वाचताना आपलेही डोळे कधी वाहू लागतात ते समजत नाही.

१९९५ साली बीबीसीनी वारीसच्या जीवनावर 'अ नोमॅड इन न्यूयॉर्क' नावाचा एक लघुपट केला. दारिद्र्यातून वैभवाकडं वाटचाल केलेल्या एका अजाण, अडाणी सोमालियन मुलीची ती जीवनकहाणी होती. मनात मागासलेपण आणि कृष्णवर्णाचा न्यूनगंड असलेल्या आफ्रिका खंडातल्या असंख्य मुलींना हा लघुपट दीपस्तंभासारखा मार्गदर्शक ठरला. वारीसमुळे नकाशावर नगण्य असलेल्या सोमालियाची दखल संपूर्ण जगानं घेतली. १९७८साली तेरा वर्षांची वारीस लंडनला आली. वयाच्या सतराव्या वर्षांपर्यंत तिला शिक्षणाचा आणि इंग्लीशचा गंध नव्हता... पण जिद्दीनी ही मुलगी इंग्लीश भाषा उत्तम प्रकारे शिकली आणि तिनं तेहेतिसाव्या वर्षी अस्खलित इंग्लीशमध्ये 'डेझर्ट फ्लॉवर' हे आत्मचरित्र प्रसिद्ध केलं. तिला मिळालेल्या अमाप संपत्तीतून तिनं आफ्रिकन स्त्रियांसाठी आणि आफ्रिकन मुलांसाठी शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य आणि आरोग्य याविषयांत खूप मोठं सामाजिक काम सुरू केलं. आजही डेझर्ट फ्लॉवर नावानी सुरू केलेलं फाऊंडेशन यासाठी हरतऱ्हेनी काम करत आहे.

एक दिवस लॉरा झिव्ह नावाची स्त्री पत्रकार वारीसला भेटायला आली. मुलाखतीत ती म्हणाली; 'मॉडेल वारीसला आता सारं जग ओळखतं. मला तुझ्या बालपणाविषयी जाणून घ्यायचे आहे.' वारीसनं इतके दिवस हृदयाच्या खोल कप्प्यात गाडून टाकलेल्या; बालपणी भोगलेल्या भयानक यातना, निर्दय आणि निष्ठुर आठवणी त्या बेसावध क्षणी भावनेच्या भरात भडाभडा सांगितल्या. लॉराचा त्या भीषण अनुभवांवर विश्वास बसेना. तिनं ती मुलाखत फॅशनला वाहिलेल्या 'मेरी क्लेयर' या मासिकात छापून आणली आणि संपूर्ण जग खडबडून जागं झालं.

पाच वर्षांची वारीस सोमालियातल्या अडाणी, अंधश्रद्ध आणि पुरुषांची मक्तेदारी असलेल्या समाजातल्या निर्घृण परंपरेची बळी ठरली होती. स्त्रीची योनी म्हणजे नरकाचं प्रवेशद्वार! मुलगी विवाहास योग्य ठरवायची तर तिच्या कौमार्याचं प्रशस्तिपत्रक हवं... म्हणून वयात येण्यापूर्वीच तिच्या योनीमार्गाची कत्तल करायची! तिच्या स्त्रित्वाची अक्षरशः चिरफाड! फिमेल जनायटल म्युटीलेशन! क्लायटोरीस, लेबिया मेजोरा आणि लेबिया मायनोरा हे अवयव चक्क कापूनच टाकायचे. समागमात मिळणारं सर्वोच्च स्वर्गीय सुख स्त्रीला कधीच मिळू नये आणि ती व्यभिचारी होऊ नये म्हणून पुरुषसत्ताक समाज पद्धतीनं केलेली ही नराधम व्यवस्था! वारीसनं हे स्वतः सोसलं होतं. तिला मोहाची दारू पाजून, नवीन कपडे घालून आई आणि बहीण कुठेतरी घेऊन गेल्या होत्या. अर्धवट बेशुद्धीत हात पाय बांधलेल्या अवस्थेत तिनं पाहिलं होतं की एक जिप्सी स्त्री अर्धवट तुटलेल्या वस्तऱ्यानं तिचे दोन मांड्यांमधले अवयव कापून काढत होती. इतकेच करून ती थांबली नाही तर बाभळीच्या काट्यांनी तिथं खालच्या भागात भोकं पाडून सुईदोऱ्यानी ती जागा तिनं चक्क शिवून टाकली. मुलगी कुमारिका असल्याचा हा घ्या पुरावा!

या प्रक्रियेत अनेक मुली घाबरून, रक्तस्राव होऊन, जंतुसंसर्ग होऊन मरून जात, ज्या जगत त्यांना आयुष्यभर मरणप्राय वेदना सहन करावी लागे. बऱ्याचजणी गर्भधारणेला मुकत किंवा प्रसूतिदरम्यान दगावत. वारीसच्या दोन बहिणी या अघोरी प्रकारात मृत्युमुखी पडल्या होत्या. वारीस म्हणाली,'मी मात्र जिवंतपणी मरणयातना भोगणारी,

कामक्रीडेच्या परमोच्च सुखाला कायमची मुकलेली, स्त्री नावाचं संवेदनाहीन यंत्र होऊन उरले आहे. हे सगळं वर्णन वाचताना आपल्या आतड्याला पीळ पडतो. वारीसच्या त्या मुलाखतीनं हे विदारक सत्य सर्व जगासमोर आलं. युनोसारख्या जागतिक संघटनेला वारीसच्या या कहाणीची म्हणजेच एफजीएम या मानवतेला काळिमा फासणाऱ्या प्रथेची दखल घ्यावीच लागली. अहवालावरून असं लक्षात आलं की दररोज जगातल्या ६००० मुली या प्रथेला बळी पडत आहेत. या शस्त्रक्रिया फिरस्त्या बायका रानावनात, वाळवंटात, वस्तीपासून दूर, कोणत्याही प्रकारची भूल न देताच करतात आणि या मुलींचा आरडाओरडा, किंकाळ्या ऐकू येऊ नयेत म्हणून स्त्रियाच जोरजोरात ढोल वाजवून मोठ्यानं गाणी म्हणतात. युरोपात अमेरिकेत पंधरा ते सतरा लाख स्त्रिया या प्रथेची शिकार झालेल्या आढळल्या. मग फिमेल जनायटल म्युटिलेशनला पायबंद घालण्याच्या उद्देशानं जागतिक चळवळ सुरू झाली. पैसा, प्रसिद्धी, प्रतिष्ठा या साऱ्यांवर पाणी सोडून वारीसनं फिमेल जनायटल म्युटिलेशनसारख्या पाशवी प्रथेला आळा घालण्यासाठी आणि आफ्रिकन देशातल्या मागासलेल्या स्त्रियांच्या उद्धारासाठी आपलं सारं आयुष्य वाहून घेतलं. आजमितीला एफजीएम विरुद्धच्या या चळवळीमुळं या अघोरी पद्धतीला बळी पडणाऱ्या मुलींची संख्या आता निम्म्यानं कमी झाली आहे. वारीसच्या कार्याला मदत म्हणून बिल गेट्स आणि वॉरेन बफे यांसारख्या अनेक धनवान लोकांनी भरभरून आर्थिक सहकार्यही केलं आहे. समाजिक सेवेसाठीचे असंख्य मोठमोठे पुरस्कार, अनेक पदव्या, सत्कार आणि अगणित मानसन्मान यांचा वारीसवर अविरतपणं वर्षाव चालू आहे.

अनेक देशांनी या चळवळीला विरोधही केला. वारीसला जीवे मारण्याचा देखील प्रयत्न केला गेला... पण जागतिक दडपणाच्या रेट्यामुळं या प्रथेवर कायदेशीर बंदी घातली गेली. युनोच्या एफजीएम प्रतिरोधक मोहिमेचं नेतृत्व करण्याचा बहुमान वारीसला देण्यात आला. वारिसचा आवाज आता जागतिक व्यासपीठावरून ऐकू येऊ लागला. वारिसनं 'डेझर्ट डॉन', 'डेझर्ट चिल्ड्रन', 'लेटर टू माय मदर', 'ब्लॅक वुमन व्हाइट कंट्री' अशी अनेक पुस्तकं प्रकाशित केली. या सर्व पुस्तकांची जगातल्या सर्व प्रमुख ६५ भाषांमध्ये भाषांतरं झाली आणि त्यांची रेकॉर्ड्स ब्रेक करणारी विक्री झाली आहे. हॉलिवूडनं सुदधा २०११साली 'डेझर्ट फ्लॉवर' हा वारीस डेअरीच्या जीवनावर चित्रपट प्रदर्शित केला आहे. वारीसच्या आयुष्यातल्या चंद्राप्रमाणं लखलखणाऱ्या एका अंगानं सर्वांची मनं जिंकली पण दुसऱ्या रखरखीत बाजूनं मात्र लोकांच्या काळजाला हात घातला. वारीसच्या या कार्याकरता तिला नोबेल पारितोषिक मिळावं यासाठी जोरदार शिफारस केली जात आहे. त्यासाठी माझंही एक अनुमोदन! तुमचं?

## सत्पात्री दान...

**रो. योगेश नांदुरकर**

ऐकण्यासाठी क्लीक करा...

प्रिय पात्राऽ

तू अगदी नाही म्हणजे नाही ताकास तूर लागून देत... म्हणून शेवटी हा इमेल प्रपंच!

नक्की तुझ्या मनात काय आहे हे मी अनेकवेळा ताडायचा प्रयत्न केला. ते अगदी अंतरंगात डोकावणं वगैरेपण करून बघितलं... पण छ्याऽ कसलं काय...?

म्हणजे बघ हं तू जसा डोळ्यांसमोर दिसतोस, भावतोस तसा लेखनात उतरताना नसतोस रे...! वाटतं... मी शाकाहारी आहे म्हणजे तूपण शाकाहारी असणार मी मद्यपान करत नाही म्हणजे तूपण दारू पीत नसणार... पण जसजशी गोष्ट उलगडत जाते नाऽ तसतसा तू केवळ मांसाहार नि मद्यपानच नाही तर भांग-गांजा यांचाही कैफ लुटताना सापडतोस.

तो वाचक तुला सुरुवातीपासून त्याच्या कल्पनाविश्वात रंगवायला लागतो, निवळ त्याच्यापुरता. काहींना तू एकसारखा भावतोस तर काहींना भावभिन्न. मग तेही तुझ्याबद्दल काही आडाखे बांधायला लागतात. काही जुळतात तर काही फसतात. काही आडाखे जुळले तर ते आधीच जोखल्यामुळं गंमतच निघून जाते किंवा कधीकधी असं झाल्यामुळं आत्मज्ञानाचा अहंभाव. काही आडाखे फसल्यामुळं धक्का बसतो किंवा फसगत झाल्यासारखं वाटतं. त्या बिचाऱ्या वाचकाच्या मनःपटाचा ठाव घेतोस नि त्याची पार कठपुतळी करून टाकतोस. तू नदीच्या पात्रासारखा अनाकलनीयही असतोस. पाणी काय नि संचित काय... दुथडी भरून वाहायला लागलं की कधी पात्र बदलतं ते कळतच नाही.

काहीवेळा तू मला हुलकावणी देत त्या प्रतिभेशी सलगी करत, वशिला लावत मलाही तोंडात बोटं घालायला लावशील असं वागतोस. कसलं सुचलंय ना... असं मनोमन वाटून तू अप्रूप आनंदही देऊन जातोस. तू एकाचवेळी अनेक वाचकांच्या भावविश्वात बहरत असतोस कसा रे असा तू सर्वव्यापी, अथांग. तू कथाकादंबरीत आढळतोस; कवितेत ढळतोस; व्यक्तिचित्र, चरित्र, आत्मचरित्र, ललित लेख, निबंध; सगळीकडं असतोस. तुला पुन्हा एकदा न्याहाळलं नाऽ की तुझ्यात कुठंकुठं मी मलाच बघतो तर कधी आवडत्या व्यक्तीला, कधी न पाहिलेल्या व्यक्तीला तर कधी कल्पनेत असलेल्या व्यक्तीला. या सगळ्यांचे गुणावगुण बाळगून कसा वावरू शकतोस रे...? ना तुला लिंगाचं वावडं ना एखादी वस्तू असण्याचं...

अरेऽ तुला सांगतो म्हणजे तू अनुभवलं असशीलच म्हणा काही लेखक तर पात्राचं व्यक्तस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य नि अभिव्यक्तिस्वातंत्र्य यांचा अजिबात मुलाहिजा न ठेवता त्या पात्राला अगदी हव्वं तस्सं वागायला लावतात. बघ नाऽ काही आईबाबा आपल्या मुलांना ताब्यात ठेवतात नाऽ अगदी तस्सं... तर काही लेखक आपल्या पात्राला मोकाट सोडून देतात. त्याला हवं तसं वागू देतात. थोडे संस्कार म्हणून काही बात असते की नाही. काही लेखकांना तर त्यांच्या पात्राला (पुरुष असला तरी...) आजाबात हात लावलेला चालत नाही. शेवटी संगोपन, व्यक्तिमत्त्व नावाची चीज काही असते की नाही...

एयऽऽ मला शंका येतीय आता हेही सगळं तूच तर लिहून घेत नसशील ना माझ्याकडून...? नको नको मग थांबलेलंच बरं आत्ता...

बोलत राहूच.
तुझा जन्मदाता
लेखक

ता. क. - एक गंमत तुला सांगून ठेवतो. कुणाला सांगू नकोस. हा इमेल मी इतर पात्रांना सीसी केलाय नि सर्व लेखकांना, संपादकांना बीसीसी केलाय....


➢ **सभासदांचा वेगवेगळ्या विषयांवरचे दृष्टिकोन मांडण्याची जागा...**
➢ **हलकंफुलकं लेखन हवं**
➢ **पुस्तकं, नाटक, चित्रपट, मालिका, वेबसिरीज**
➢ **राजकारण, समाजकारण, चालू घडामोडी**

**दृष्टिकोन**

**तुमचा लेख आवर्जून द्या...**
**समन्वयक**
**योगेंद्र नातू / अभिजित देशपांडे**

## ऑक्सिजन सिलेंडर्ससाठी मदतीचे आवाहन

**डॉ. विजया गुजराथी**

अकरा मे रोजी संध्याकाळी माझे ताराचंद रुग्णालयाच्या श्री. गोपालभाई राठी यांच्याबरोबर बोलणे झाले. आम्ही रोज सिरिअस पेशंट्स बघत होतो. रुग्णांची आणि रुग्णालयांची ऑक्सिजनसाठीची धडपड पाहून अंतःकरण हेलावून जात होते. अशावेळी रुग्णालयांची ऑक्सिजन सिलेंडर्सची अडचण कळत होती. मनात आले की आपल्या रोटरी क्लबकडून या कामात नक्कीच मदत होईल. रोटरी क्लब पुणे साऊथच्या सदस्यांची सामाजिक बांधिलकीची जाणीव, मदत करण्याची तत्परता अजोड आहे. त्यातून गेल्या दहा-बारा वर्षांत ताराचंद हॉस्पिटल हा जणू आपलाच एक भाग बनलाय. त्यांच्या हाकेला ओ देणे आपले कर्तव्यच आहे. या सर्वांचा विचार करून मी आपल्या क्लबमध्ये आवाहन केले. जास्तीतजास्त लोकांनी थोडा थोडा सहभाग घेऊन मदत गोळा केली तरी आपण भरीव मदत करू शकतो अशी खात्री वाटली. आपल्या क्लबमधील दानशूर व्यक्तिंनी सामाजिक बांधिलकी जपण्याच्या जाणिवेतून केलेल्या मदतीमुळे आज आपण जवळजवळ दोन लाख रुपये जमा करू शकलो आहोत. ताराचंद हॉस्पिटलला ऑक्सिजनचा सप्लाय जिथून होत होता त्या ठिकाणी ऑक्सिजन सिलेंडर्स आणण्यासाठी टेम्पो पाठविणे हे पण त्यांना कठीण होते. रोटरीच्या हाकेला नेहमी धावून येणारे आपले ज्येष्ठ रोटेरिअन दत्ताजी देवधर हे त्यांच्या मदतीसाठी लगेच धावून आले व त्यांनी या कामासाठी त्यांच्या ऑफिसचा टेम्पो थोड्या दिवसांकरता उपलब्ध करून दिला. आपले सभासद रोटेरिअन राजेश बेळगावकर हे ऑक्सिजन सिलेंडर्स रिफील करून देतात. त्यांनी ताराचंद हॉस्पिटलला अतिशय स्वस्तात ऑक्सिजन भरून देण्याचे कबूल केले आणि पुढील काही दिवस किंवा आठवडे ते मदत करू शकतील असेसुद्धा सांगितले या सर्वांमुळे ताराचंद हॉस्पिटलला जवळपास दीड लाखांची मदत होणार आहे.

आपण सगळ्यांनी माझ्या आवाहनाला प्रतिसाद देऊन सढळ हातांनी मदत केलीत त्याबद्दल मी आपल्या सर्वांचे कौतुक करते व आभार मानते. श्री. विनोद भाई यांनी ताराचंद हॉस्पिटलमध्ये रोज फोन करून समन्वय साधण्याचे काम केले त्याबद्दल त्यांचेसुद्धा खूप खूप आभार. काल अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर आपण ताराचंद हॉस्पिटलला एक लाख एकवीस हजार रुपये ट्रान्सफर केले आहेत व त्यांना क्लबतर्फे पत्रसुद्धा दिले आहे. अजून काही दिवसांनी आपण पुढील पैसे पाठवू. ते पैसे ऑक्सिजनसाठी किंवा इतर आवश्यकता असेल त्यासाठी ते वापरू शकतील. सर्व देणगीदारांचे पुनःश्च धन्यवाद.

## DONATION TO TRUST FOR MEDICAL PROJECT

| SR.NO | NAME | AMOUNT |
|---|---|---|
| 1 | Rtn. Vinod Aggarwal | 5000 |
| 2 | Rtn. P. Sudarshan Natu | 6000 |
| 3 | Ann Sneha Ogale | 10000 |
| 4 | Rtn. Abhijit Joag | 5000 |
| 5 | Rtn. Rashmi Parulkar | 5000 |
| 6 | Ann Leena Gogate | 3000 |
| 7 | Rtn. Vilas Apte | 3000 |
| 8 | Rtn. Sunil Joshi | 3000 |
| 9 | Ann Prajakta Badve | 3000 |
| 10 | Rtn Mridula Ghodke | 5000 |
| 11 | Ann Rupali Thangaokar | 5000 |
| 12 | Rtn. Atul Atre | 5000 |
| 13 | Rtn. Shrikant Paranjape | 3000 |
| 14 | Ann Madhuri Kirpekar | 5000 |
| 15 | Rtn. Hemant Walimbe | 3000 |
| 16 | Rtn. Raghvendra Ponkshe | 5000 |
| 17 | Rtn. Sudhir Waghmare | 11000 |
| 18 | Rtn. Arun Kudale | 5000 |
| 19 | Ann Shobha Kudale | 5000 |
| 20 | Rtn. Anand Kulkarni | 5000 |
| 21 | Ann Mohini Natu | 5000 |
| 22 | Rtn. Kiran & Ann Geetanjali Purohit | 10000 |
| 23 | Rtn. Ajit Phadke | 2500 |
| 24 | Rtn. Shrikrishna Chitale | 21000 |
| 25 | Ann Swati Velankar | 5000 |
| 26 | Rtn. Arvind Mawlankar | 5000 |
| 27 | Dr. Vijaya Gujarathi | 11000 |
| 28 | Rtn. Arvind Shiralkar | 5000 |

| SR.NO | NAME | AMOUNT |
|---|---|---|
| 29 | Rtn. Anil Deshmukh | 3000 |
| 30 | Rtn. Sham Kulkarni | 5000 |
| 31 | Rtn Pradip Paranjpe | 5000 |
| 32 | Rtn. Ravindra Prabhune | 5000 |
| 33 | Mr. Ranjeet Pal | 25000 |
| 34 | Mr. Sant Singh Mokha | 15000 |

Rtn. Dattaji Deodhar
sponsored Tempo logistics for Oxygen cylinders
Rtn. Rajesh Belgaonkar
offered special rates for Oxygen Refilling

- Donation to TRF

1. Rtn. Madhuri & Mr Uday Kirpekar $ 100/- (April 2021)
2. Rtn. Madhuri & Uday Kirpekar $ 100/- (May 2021)

- Donation to Foundation

President Rtn. Sudarshan & FL Ann Sugandha Natu
($1370) Rs.1,00,000 Became Major Donor Level 1

- Donation to Trust

| | |
|---|---|
| Rtn. PN Sanjeev & Ann Sneha Ogale | Rs. 11,000/ |
| Mr. Milind Kulkarni | Rs. 10,000/- |
| Mr. Vinayak Dongre | Rs. 10,000/- |

President Rtn. Jayashree Deshpande,
RCP Sarasbaug Rs.15,000/- For Godaan Project

- Special Appreciation

Donation by Aditya Sambhare
Gautam & Gayatri Sambhare Rs. 50,000/-
In the loving memory of Mrs. Kiran and Mr.Dilip Sambhare

- Donation Club/Foundation

AG Rtn. PP Abhay Jabade $100 (Rs.7500/-)

100% Donor Club

Rotary Club of Pune South paid online $30/member (90 members) to The Rotary Foundation.
Total $2700 paid.


- शुभेच्छा
- स्मृती
- गवसणी
- या महिन्यात मागच्या वर्षांत...

विशेष

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक
श्वेता करंदीकर



Rtn. President Sudarshan Natu | Rtn. PN Sanjeev Ogale | Rtn. Yogesh Nandurkar | Rtn. Yogendra Natu
Rtn. Abhijit Deshpande | Rtn. Anand Kulkarni | Rtn. Yamini Ponkshe | Rtn. Shweta Karandikar

## क्रिएटिव्ह असिस्टन्स आणि कोऑर्डिनेशन
## टीम सहयोगी

**उल्का पासलकर,**
**कादंबरी सहस्त्रबुद्धे,**
**मेधा प्रभुदेसाई,**
**प्रचिती तलाठी,**
**तृप्ती कुलकर्णी,**
**सायली रत्नपारखी- जोशी**

## सदरं

- मुखपृष्ठ .........................श्वेता.............. विधानं/ कोट्स
- संपादकीय/ अध्यक्षीय........योगेश /सुदर्शन
- रोटरी.........................योगेंद्र / अभिजित............... रोटरी मंच/RI
- डिस्ट्रिक कनेक्ट...........योगेंद्र / अभिजित........ डिस्ट्रिक घडामोडी
- क्लबकारी........................आनंद / यामिनी..........क्लब घडामोडी
- कलाकारी........................आनंद / यामिनी..........सभासद गुणदर्शन
- दृष्टीकोन.......................योगेंद्र / अभिजित..........पुस्तक, चित्रपट इ.
- विशेष............................श्वेता....................शुभेच्छा, स्मृती
- क्रिएटिव्ह असिस्टन्स आणि कोऑर्डिनेशन..........टीम सहयोगी